## बेस्टच्या निवडणुकीत ठाकरे ब्रँडचा बँड वाजला : मुख्यमंत्री



**मुंबई :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. १६) भारतीय जनता पक्षाचा मुंबईत विजय संकल्प मेळावा झाला. या मेळाव्यात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील बेस्ट सहकारी पतपेढीच्या निवडणुकीचा दाखल देत ठाकरे ब्रँडचा बँड वाजवला, असे सांगून आम्ही २०२४मध्ये पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणून दाखवले. आता महापालिकेच्या निवडणुकीकडे आपण चाललो आहोत. काही झाले तरी मुंबईमध्ये महायुतीचा झेंडा फडकवल्याशिवाय आम्ही राहणार नाही. मुंबईत महायुतीचाच महापौर होईल, असा विश्वास व्यक्त केला. आमच्याकडे चहा विकणारा जागतिक ब्रँड म्हणून जगात एस्टॅब्लिश होतो. अशा प्रकारचा ब्रँड निर्माण करणारा आमचा पक्ष आहे. आम्हाला कोणीही ब्रँड सांगू नये. जगातला सर्वात मोठा ब्रँड आमच्याकडे आहे, त्या ब्रँडचे नाव नरेंद्र मोदी असे आहे, असेही ते म्हणाले.

रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ६०
www.ramprahar.com

बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मुदतवाढ/३
रायगडात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान/५
वासांबे प्रीमियर लीगसाठी ऑक्शन उत्साहात/८



# मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात वाढ

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आणि मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठीचा भत्ता यामध्ये वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.




सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींसाठीच्या शिक्षणासाठी शासकीय वसतिगृहे ही योजना राबविली जाते. राज्यात ४४३ शासकीय वसतिगृहे आहेत. मुलांच्या २३० वसतिगृहात २३ हजार २०८ तर मुलींच्या २१३ वसतिगृहात २० हजार ६५० मुलींची प्रवेश क्षमता आहे. याप्रमाणे शासकीय वसतिगृहात एकूण ४३ हजार ८५८ विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात येते. नुकतीच आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारितील वसतिगृहातील मुला-मुलींच्या सोयी-सुविधा भत्त्यांमध्ये वाढ करण्यास ४ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.

यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वसतिगृहातील मुला-मुलींसाठीच्या निर्वाह भत्त्यात आणि मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठीच्या भत्त्यात वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. वाढ करण्यात आलेला भत्ता पुढीलप्रमाणे (कंसात सध्याचा भत्ता) विभागस्तर - १ हजार ५०० (८०० रू.), जिल्हास्तर - १ हजार ३०० (६०० रु.), तालुकास्तर - १ हजार (५०० रु.). विद्यार्थिनींसाठी स्वच्छता प्रसाधन भत्ता- दिडशे रुपये (१०० रु.).हा भत्ता १ सप्टेंबर २०२५ पासून देण्यात येईल.यानुसार वाढ केल्यामुळे दरवर्षी ८० कोटी ९७ लाख ८३ हजार १४६ रुपयांचा वाढीव खर्चाच्या तरतुदीस मान्यता दिली.

## खालापुरात गुटखा वाहतूक करणारा टेम्पो पकडला

**खालापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गुटखा विक्रीवर बंदी असतानाही गुटखा तस्करांनी ही बंदी धाब्यावर बसवल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, खालापूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत विमल पानमसाला गुटख्या असा १६ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग, मारुती सुझुकी सुपरकॅरी, छोटा हत्ती टेम्पो सावरोली टोलनाकामार्गे मुंबई-पुणे जुन्या महामार्गाने अवैधरित्या गुटखा वाहतूक करीत असताना पोलिसांनी सापळा रचून टेम्पोला थांबविण्याचा प्रयत्न करताच चालकाने गाडी थांबवून अंधाराचा फायदा घेत पलायन केले, मात्र पोलिसांनी टेम्पो ताब्यात घेतला. टेम्पोची तपासणी केल्यावर पांढऱ्या नायलॉनच्या गोण्या व खाकी रंगाच्या बारदानामध्ये मोठ्या प्रमाणावर विमल पानमसाला व गुटखा सापडला.

एकूण ५२ हजार ८०० रुपयांचा तंबाखू, ९ हजार रुपयांच्या तीन लहान गोण्या, १ लाख ८ हजार ९०० रुपयांच्या २५ मोठ्या गोण्या, तसेच ४ लाख रुपयांचा सुपरकॅरी टेम्पो असा एकूण १६ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे, खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिकगुन्हे अन्वेषण शाखेचे निरीक्षक मिलिंद खोपडे, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली. खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणताही अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आढळल्यास नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी, असे अवाहन त्यांनी केले आहे.

## नवी मुंबईत २५० रुग्णांची केली मोफत तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

कळंबोली रोडपाली येथील व्हाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, ही अत्याधुनिक मल्टी-स्पेशालिटी सुविधा, भारतातील वाढत्या असंसर्गजन्य आजारांवर विशेषतः मधुमेह आणि स्थूलपणा याविरुद्ध लढ्यात आघाडीवर आहे. रुग्णालयात डायबेटीस अँड ओबेसिटी चेक शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये नवी मुंबई आणि आसपासच्या भागातील २५०हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला.

तपासणीनंतर रुग्णालयातील वरिष्ठ सल्लागारांनी त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले. पाच हजार रुपयांपर्यंतच्या चाचण्यांची मोफत तपासणी करण्यात आली.

मधुमेह आणि स्थूलपणा यांसारख्या एनसीडीचा धोकादायक वाढता प्रसार लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील कुटुंबांनी यावर गांभीर्याने लक्ष द्यावे, असे आवाहन केले होते. स्वातंत्र्य दिन २०२५ रोजी लाल किल्ल्यावरून देशवासियांना संबोधित करताना त्यांनी शहरी भारतात स्थूलपणाला निःशब्द महामारी असे संबोधले आणि भविष्यात यामुळे मोठे आरोग्य आव्हान निर्माण होऊ शकते असा इशारा दिला होता.

या उपक्रमाबाबत डॉ. विजय डिसिल्वा, मेडिकल डायरेक्टर, व्हाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नवी मुंबई म्हणाले, मधुमेह आणि स्थूलपणा हे फक्त जीवनशैलीचे आजार राहिलेले नाहीत, तर त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यास ते अनेक अवयवांच्या गुंतागुंतींना कारणीभूत ठरू शकतात.

## कोकण विभागातही आजपासून सेवा पंधरवडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्याची आवश्यकता विचारात घेऊन, भारताचे मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा आगामी जन्मदिन दि. १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि.०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राज्यभर 'सेवा पंधरवडा' राबविण्याबाबत शासन स्तरावरून निर्देश देण्यात आलेले आहेत.

कोकण विभागात हे अभियान दि. १७ सप्टेंबर २०२५ ते दि. २२ सप्टेंबर २०२५, दि.२३ सप्टेंबर ते दि. २७ सप्टेंबर २०२५ व दि. २८ सप्टेंबर ते दि. ०२ ऑक्टोबर २०२५ या ३ टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात



'पाणंद रस्ते विषयक मोहिम', दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत शासन तरतुदींची अंमलबजावणी व पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप मोहिम' तर तिसऱ्या टप्प्यात 'जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक परिस्थितीचा विचार करून नाविन्यक्रम उपक्रम राबविणे' या कार्यक्रमांचा समावेश आहे. अशी माहिती कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात एकूण ७ हजार २४१ पाणंद/शिव रस्ते असून गाव नकाशाप्रमाणे सदर रस्त्यांची पहाणी करण्याचे काम तालुका स्तरावरून सुरू आहे. तसेच सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मध्ये कोकण विभागात घरांचे एकूण उद्दीष्ट १ लाख २६ हजार ४४५ असून त्यापैकी १ लाख २६ हजार ३१२ (९९.९०%) घरांना मंजूर दिलेली आहे. त्यापैकी १५ हजार ६६० घरकुलांचे काम पुर्ण झाले असून उर्वरीत सर्व १ लाख १० हजार ६५२ घरकुलांचे काम प्रगती पथावर आहे. गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वन क्षेत्र वगळून उर्वरित शासकीय जमिनींवर सन २०११ पुर्वीपासून निवासी प्रयोजनार्थ झालेल्या अतिक्रमणांची यादी निश्चित करण्यात येत आहे.

यापुर्वी कोकण विभागात जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी संदर्भात एकूण दाखल ४४ हजार १६५ वारस फेरफारांपैकी ४२ हजार ९१० वारस फेरफार मंजूर करण्यात आले आहेत. कोकण विभागातील शासकीय व सार्वजनिक प्रयोजनार्थ वापरात असलेल्या जमिनी वगळून उर्वरित आकारीपड जमिनी या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे सुधारित कलम २२० अंतर्गत पुन्हा मिळणेकामी संबंधित मूळ खातेदार अथवा त्यांचे कायदेशीर वारसांनी जिल्हाधिकारी कार्यालयांकडे अर्ज करणेबाबत कोकण विभागीय आयुक्त यांनी आवाहन केले आहे.

## पोलिसांच्या छाप्यात जुगार खेळताना सापडले दोन शिक्षक

**खोपोली : प्रतिनिधी**

वावंढळ येथील फार्म हाऊसवर चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात पकडलेल्या अकरा आरोपींपैकी दोन जण प्राथमिक शिक्षक असल्याचे उघडकीस आल्याने खालापूर तालुक्यात मोठी खळबळ माजली आहे.

दोन दिवसांपूर्वी खालापूर पोलीस पथकाने वावंढळ येथील लीलाज फार्महाऊसवर छापा टाकत दोन लाख ११ हजार रुपये रोख रक्कम आणि जवळपास २७ लाख रुपये किंमतीच्या ११ चारचाकी जप्त केल्या. पकडलेल्या अकरा आरोपींपैकी गोविंद विठ्ठल ठाकूर वय ४३ रा. हातनोली, खालपुर आणि सुरेश जनार्दन मांडे वय ४५ रा. तळेगाव खालापूर हे तालुक्यातील प्राथमिक शाळेत विद्यार्जन करणारे शिक्षक आहेत. दोघांचीही ओळख आदर्श शिक्षक म्हणून परिसरात आहे, परंतु पत्त्याचा जुगार खेळताना सापडल्याने शिक्षकी पेशाला काळिमा फासण्याचे काम दोघांनी केल्याची चर्चा तालुक्यात रंगली असून शिक्षण विभागाकडून आता कोणती कारवाई होते याकडे आता लक्ष लागले आहे. अखेर गुरुजी तुम्ही सुद्धा असे उद्या विद्यार्थी बोलले तर त्यात आश्चर्य नसणार आहे.

## माय मराठीसाठी तरुण पिढीने पुढे आले पाहिजे

### पानिपतकार विश्वास पाटील यांचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

माय मराठी साठी मी पुढे येणारच ,पण तरुण पिढीने सुद्धा पुढे आले पाहिजे असे आवाहन पानिपतकार व ९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच् नियोजित अध्यक्ष पानिपतकार विश्वास पाटील यांनी खोपोली येथे भावना व्यक्त केली ,आठवी मध्ये शिकत असताना आपण कै. र.वा. दिघे यांची सराई कादंबरी वाचली. त्यातील साहित्य वर्णनामुळे आपण भारावून गेलो होतो. तेव्हाच कुठेतरी लेखक व्हायला पाहिजे असं वाटू लागलं .दिघे यांच्या साहित्याचे माय मराठीवर फार मोठे उपकार आहेत. माझे ते साहित्यिक गुरु आहेत. त्यामुळे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर कै. र.वा.दिघे यांना अभिवादन करण्यासाठी व त्यांचे आशिर्वाद घेण्यासाठी दिघे यांच्या निवासस्थानी व स्मारकामध्ये आलो आहे, असे भावनिक उद्गार ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष 'पानिपत'कार विश्वास पाटील यांनी खोपोली येथे बोलताना काढले.



या प्रसंगी साहित्यिक डॉक्टर महेश केळुसकर, अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी संचालक भगवानराव वैराट, साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ, सोपान खुडे, काशिनाथ गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. पाटील यांनी प्रथम रवा दिघे यांच्या निवासस्थानी भेट दिली यावेळी त्यांचे सुपुत्र वामनराव दिघे, स्नुषा कवयित्री उज्वला दिघे, नातू कौस्तुभ दिघे, नात सून दर्शना दिघे यांनी विश्वास पाटील यांचे स्वागत करून सत्कार केला. दिघे कुटुंबियांच्या सत्कारामुळे आपण भारावून गेलो आहोत, असे विश्वास पाटील यांनी सांगितले. दिघे यांच्या कादंबऱ्यांनी संपूर्ण भारतभरात अनेक लेखक घडवले आहेत. नवीन कादंबरीकारांनी दिघे यांच्या साहित्याचा अभ्यास केला पाहिजे असेही ते म्हणाले. दिघे यांच्या साहित्यातील निसर्ग चित्रण ,व्यक्ती चित्रण हे अभ्यासण्यासारखे असते. त्यांच्या कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत . मराठी साहित्यामध्ये मी जे काही वेडे वाकुडे लिहायला लागलो आहे, त्याचे श्रेय कै. र.वा.दिघे यांच्याकडे जाते. दिघे यांचे आपल्यावर फार मोठे उपकार आहेत,असे गौरवोद्गारही विश्वास पाटील यांनी काढले.

यानंतर कै. र.वा.दिघे स्मारकामध्येही पाटील यांनी दिघे यांच्या शिल्पाला पुष्प वाहून अभिवादन केले. याप्रसंगी मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील, माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, उल्हास देशमुख, कोमसाप चे उपाध्यक्ष डॉक्टर भाऊसाहेब नन्नवरे ,कार्यवाह नरेंद्र हर्डीकर, रेखाताई कोरे,सदस्य नितीन भावे जनार्दन सटाणे, डॉक्टर सुभाष कटकदौंड ,जयश्री पोळ, कौस्तुभ दिघे ,दर्शना दिघे इत्यादी सदस्य उपस्थित होते. यावेळी त्यांनी रवा दिघे सभागृहात आयोजित खोपोलीकरांच्या सत्काराला उत्तर देताना आपण रायगडचे असल्याचे सांगताना जिल्हा परिषदेला ५१ लाखाचा पुरस्कार मिळवून दिल्याची स्मरण करताना जिल्ह्यातील ७० सरपंचांना दिल्ली येथे नेऊन पुरस्कार मिळवून दिल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. . आचार्य अत्रे, अण्णाभाऊ साठे, व रवा दिघे हे मला गुरुस्थानी आहेत म्हणूनच मी आचार्य अत्रे अण्णाभाऊ साठे यांचे स्मरण केल्यानंतर खोपोलीत मी रवा दिघे यांना अभिवादन करण्यासाठी आलो ,कारण या तिघांना मी गुरुस्थानी मानत असल्याचे सांगितले. मोबाईल संस्कृतीमुळे तरुणाई धोकादायक जीवन जगत आहे २४ तासातील सहा तास सर्वजण यात अडकलेले असतात याकरिता सामाजिक स्तरावर याबाबत जनजगृती होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले, शिक्षकांनी यासाठी पुढाकार घेणे काळाची गरज असल्याचे पण त्यांनी आवर्जून सांगितले.

खोपोलीकरांनी दिलेल्या भरभरून प्रेमापोटी मी कृतज्ञता व्यक्त करीत आहे. सध्या सर्वत्र जातीपातीचा चर्चा होत असताना चर्चा होत असतात आम्ही लेखक व कवी, आम्हा लेखक व कवींचा धर्म माणुसकीचा असल्याचे त्यांनी उपस्थित त्यांना सांगितले. सातार येथे आयोजित साहित्य संमेलना सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे असेही पाटील यांनी आवाहन केले, यावेळी खोपोली शहरातील मान्यवर व साहित्यिक उपस्थित होते.

## पेणमध्ये गोठा कोसळून दोन गाईंचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहेत. अशातच पेण तालुक्यातील जांभुळवाडी (मोहिनी इनाम) येथे गुरांचा गोठा कोसळून दोन गाईंचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.१४) घडली.

शेतकरी बाळकृष्ण गोटीराम गुडेकर यांच्या मालकीचा गुरांचा गोठा पावसामुळे कोसळला. या वेळी त्यात असलेल्या दोन गाई मृत्युमुखी पडल्या. याबाबतची माहिती मिळताच तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी संबंधित तलाठी, सर्कल तसेच कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवून घटनेचा पंचनामा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पंचनामा पूर्ण झाला असून नुकसाभरपाईसाठी तो पुढे पाठविण्यात आला आहे.

## सीकेटी विद्यालयात जागतिक ओझोन दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी १६ सप्टेंबर हा दिवस जागतिक ओझोन दिन म्हणून संपूर्ण विश्वात साजरा केला जातो. या दिनानिमित्त नवीन पनवेलमधील सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात मंगळवारी जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यात आला.

यलो हाऊसच्या विद्यार्थ्यांनी या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडली. या कार्यक्रमाचा विषय जागतिक कृती विज्ञान (Science to Global Action) हा होता. विद्यार्थ्यांनी या निमित्ताने ओझोन वायूचा थर व



त्याचे महत्व या विषयावर भाषणे दिली. ओझोनवर आधारित कविता सादर केली. विद्यार्थ्यानी ओझोन वर आधारित एक छोटी नाटिका सादर केली. ओझोन वायूचे रक्षण करण्याची व पर्यावरण जपण्याची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, गणित शिक्षिका स्मिता भालेकर व नीता बालशी उपस्थित होते. या कार्यक्रमात इयत्ता नववी ब चे विद्यार्थी सहभागी झाले.

## खारघरमध्ये सम-विषम पार्किंगबाबत विशेष अधिसूचना जारी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर शहर सेक्टर २० मध्ये सम-विषम पार्किंगबाबत खारघर वाहतूक शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक जमील शेख यांनी विशेष अधिसूचना जारी केली आहे. यासंदर्भात भाजपचे रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांनी पाठपुरावा केला होता.

अधिसूचनेत दिलेल्या तपशीलामध्ये खारघर वाहतूक शाखा परिसरात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि बाजारपेठ आणि मेट्रो स्टेशन असल्याने सिडको किंवा पनवेल महापालिका अंतर्गत परिसरात पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसल्याने वाहनचालक रस्त्याच्या दोन्ही बाजूला बेशिस्तपणे त्यांची वाहने पार्क करतात. ज्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे आणि अपघात होऊ शकतात. भाजप रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांच्याकडून सम-विषम पार्किंगसाठी अर्ज कार्यालयात प्राप्त झाला आहे.

त्यानुसार केसर गार्डन सोसायटी जवळील सर्व्हिस रोड (प्लॉट क्रमांक ५३) रोड सेक्टर २०, उन्नती होउ सोसायटी. (प्लॉट क्र. ६९) सेक्टर क्र. २१ ते नवजीवन हॉस्पिटल, सेक्टर क्र. २१, शुभहोम सोसायटी (प्लॉट क्र. ७८) सेक्टर-२० ते ट्विन्स टॉवर प्लॉट क्र.- ५१, सेक्टर-२० खारघर, शिल्प चौक सेक्टर- १३ ते गोखले स्कूल रोड सेक्टर क्र. १२ खारघर, गोकुळधाम सोसायटी सेक्टर क्र. २० ते सूर्य किरण सोसा, सेक्टर क्र. २०, खारघर, इनटॉप सोसा (प्लॉट क्र. १२/१३), एस. क्र. १९ ते पाटील रेसिडेन्सी सेक्टर-१९ रोड या ठिकाणी पार्किंगसाठी समविषमचे नियोजन होणार आहे.

## शिक्षकांसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जयंतीदिन ५ सप्टेंबर हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने ११ सप्टेंबर रोजी नवी मुंबई महापालिकेतील शिक्षकांनी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता नमुंमपा शाळेतील शिक्षकांचा शिक्षक दिन आगरी कोळी सांस्कृतिक केंद्र, नेरूळ येथे मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक, शिक्षिका, बालवाडी शिक्षिका, मदतनीस बहुसंख्येने उपस्थित होते. ईशस्तवन व स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्याचे वने मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते शिक्षक व विद्यार्थ्यांचा अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. या वेळी मंत्रीमहोदयांनी शिक्षकांनी मांडलेल्या शैक्षणिक साहित्याच्या प्रदर्शनाचे अवलोकन करून कौतुक केले.

या वेळी ५ वी आणि ८ वीच्या स्कॉलरशीप परीक्षेत गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना गौरविले गेले तसेच गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना अध्यापन केलेल्या शिक्षकांचाही गुणगौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये प्रथम ३ क्रमांकांचे विद्यार्थी तसेच प्रत्येक विषयात प्रथम क्रमांक आलेले विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणारे शिक्षक व शाळा यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, समाजविकास विभागाच्या उपायुक्त नयना ससाणे, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे, शिक्षणाधिकारी

सुलभा बारघरे यांनी उपस्थित राहून शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.बाल वैज्ञानिक स्पर्धेमध्ये शुभम कनोजिया, नमुंमपा शाळा क्रमांक १८, सानपाडा या विद्यार्थ्याला तामिळनाडू येथील शिक्षण मंत्र्यांकडून विशेष पुरस्कार मिळाला होता, त्यालाही सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ६०
www.ramprahar.com

बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता पुढे जाणार आहेत. ३१ जानेवारी २०२६पर्यंत निवडणूक



प्रक्रिया पूर्ण करावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. राज्यातील महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यासाठी जानेवारी २०२६अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी करणारा अर्ज राज्य निवडणूक आयोग आणि सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता. त्यावर मंगळवारी (दि. १६) सुनावणी झाली. या वेळी न्यायालयाकडून मुदवाढ मिळाली आहे. यामुळे निवडणूक आयोगासह राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने प्रभागांची पुनर्रचना, आरक्षणे, मतदार याद्या अद्ययावत करणे आदी प्रक्रिया सुरू केली आहे, मात्र कर्मचाऱ्यांच्या कमतरतेसह इतर काही कारणांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ मागण्यात आली होती. न्यायालयाने ही मागणी मान्य केली तसेच निवडणूक आयोगाने त्यांच्या ज्या मागण्या असतील त्या संदर्भात सरकारकडे पाठपुरावा करावा, असे सूचित केले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त आजपासून राज्यात सेवा पंधरवडा

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत भाजपच्या वतीने सेवा पंधरवडा राबवला जाणार आहे. या अंतर्गत राज्यभरात स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, चष्मे वाटप, मोदी विकास मॅरेथॉन आणि क्रीडा स्पर्धा यांसारख्या विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सेवा पंधरवडा लोकसहभागातून राबवला जाणारा आहे. यामार्फत केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा प्रसार, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने जनजागृती केली जाईल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. यात पक्षाचे सर्व खासदार, आमदार, मंत्री, नेते आणि कार्यकर्त्यांना बूथ व मंडळ स्तरावर सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.



या पंधरवड्यात राज्यातील सर्व मंडळांमध्ये रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर आणि स्वच्छता अभियानांचे आयोजन केले जाणार आहे. १७ सप्टेंबर रोजी पुण्यात दुपारी ३ वाजता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली विविध जनकल्याणकारी योजनांचे लाभ वितरणाचे कार्यक्रम होतील. याशिवाय नमो नेत्र संजीवनी अभियानांतर्गत एक लाखांहून अधिक मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि १० लाखांहून अधिक लोकांना चष्मे वाटप करण्याचे नियोजन आहे. ४८ लोकसभा मतदारसंघांमध्ये खासदार चषक क्रीडा स्पर्धांचे आयोजन होणार असून २० सप्टेंबरपर्यंत त्यासाठी नोंदणी केली जाईल. याचबरोबर २१ सप्टेंबर रोजी युवा मोर्चाच्या माध्यमातून प्रमुख जिल्ह्यांमध्ये मोदी विकास मॅरेथॉनचे आयोजन होईल, ज्यामुळे विकसित भारत २०४७ संकल्पनेला गती मिळेल.

याव्यतिरिक्त दिव्यांगांचा सन्मान, वृक्षारोपण, वोकल फॉर लोकलचा प्रचार, विकसित भारत चित्रकला स्पर्धा आणि खादी वस्तूंच्या खरेदीला प्रोत्साहन देणारे उपक्रमही राबवले जाणार आहेत.

### गव्हाण येथे होणार स्वच्छता अभियानाचा शुभारंभ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. कौशल्यमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक संस्थांमधून हजारो विद्यार्थी एकत्र येणार असून तब्बल ७५० गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवणार आहेत. या उपक्रमाचा शुभारंभ बुधवारी (दि. १७) सकाळी ११ वाजता पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयासमोर होणार आहे. या अभियानाचे प्रमुख मार्गदर्शक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असून उद्घाटन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते होणार आहे.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावर

# शिवस्मारक आणि शिवमुद्रा उभारणार

### मंत्रालयात बैठक : मंत्री आशिष शेलार यांनी दिले कार्यवाहीचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अटल सेतूजवळ शिवस्मारक व शिवमुद्रा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी सिडकोमार्फत कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी मंगळवारी (दि. १६) दिले. या संदर्भात आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, सचिव डॉ. किरण कुलकर्णी, नवी मुंबईचे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासह सिडको आणि एमएमआरडीचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी माहिती देताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्राला समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. या वारशाची माहिती सर्वांना असणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड या राजधानीच्या जिल्ह्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जगभरातील पर्यटक येतील, त्या वेळी महाराष्ट्राची संस्कृती माहिती होण्यासाठी अटल सेतूजवळ शिवस्मारक व शिवमुद्रा उभारण्याबाबत सिडकोने निधी मागणीचा प्रस्ताव तयार करावा आणि तो शासनाकडे सादर करून मान्यता घेत या कामाला गती द्यावी. सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी शिवस्मारक व शिवमुद्रा उभारण्याच्या अनुषंगाने विविध विभागांच्या परवानग्या घेण्यात याव्यात, असेही मंत्री शेलार यांनी सांगितले.








**मुंबई :** स्थानिक उद्योजकता, आर्थिक स्वावलंबन आणि जीएसटी सुधारणा मार्गदर्शन यावर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशाने भाजपच्या वतीने आत्मनिर्भर भारत संकल्प व नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाच्या कार्यशाळेचे उद्घाटन मंगळवारी दादर येथील भाजपच्या वसंत स्मृती कार्यालयात झाले. या वेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, विधान परिषदेचे सभापती रामराजे शिंदे, खासदार डॉ. भागवत कराड, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, संजय केणेकर, विक्रांत पाटील यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## न्हावाशेवा बंदरात पाकिस्तानी माल जप्त; दोघांना अटक

**उरण : प्रतिनिधी**

युएईच्या नावाखाली २८ कंटेनरमधून न्हावाशेवा बंदरात पाठविण्यात आलेला पाकिस्तानचा ८०० मेट्रिक टन माल मुंबई महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) जप्त केला आहे. यामध्ये सौंदर्य प्रसाधने आणि सुक्या खजुराचा समावेश असून जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत १२ कोटीच्या घरात आहे. या प्रकरणी दोन आरोपींना डीआरआयने अटक केली आहे.

दुबईमध्ये राहणाऱ्या एका भारतीय पुरवठादाराने बनावट पावत्या देऊन पाकिस्तानमधून सुक्या खजुरांची वाहतूक सोपी केली होती, तर पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनांच्या प्रकरणात मूळ देशाबाबत खोटी माहिती जाहीर करून तस्करी करण्यात मदत करणाऱ्या एका सीमाशुल्क दलालालाही अटक करण्यात आली असल्याची माहिती डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



## संपादकीय

# पावसाचे बदलते रूप

रविवारपासून राजस्थानच्या पश्चिम भागातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु झाल्याचे हवामान विभागाने जाहीर केले असले तरी आणखी काही दिवस देशात पाऊस असणारच आहे. यंदाच्या पावसाळ्यात निसर्गाचे रौद्ररूप अनुभवलेल्या भागांमध्ये आतातरी लोकांना सावरता येईल असे वाटत असतानाच सोमवारी रात्री पुन्हा उत्तराखंडमध्ये ढगफुटी झाली. यंदा पावसाने एकीकडे पीकपाण्याची चिंता मिटवली तर दुसरीकडे काही राज्यांमध्ये होत्याचे नव्हते केले आहे.

**यंदा मान्सून सरासरीपेक्षा अधिक बरसणार हा हवामान विभागाचा अंदाज खरा ठरला आहे. जून, जुलै, ऑगस्ट या तिन्ही महिन्यांत देशाच्या बहुतांश भागांत शंभर टक्क्यांहून अधिक पावसाची नोंद झाली. महाराष्ट्रात यंदा पावसाचे प्रमाण ११० टक्के इतके राहिले आहे. यंदा नेहमीपेक्षा आधीच २४ मे रोजी मान्सून केरळसह कर्नाटक किनारपट्टीवर दाखल झाला होता. त्यानंतर २५ मे रोजी महाराष्ट्रात पोहोचत त्याने थोडी विश्रांती घेतली. पण १७ जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला. त्यानंतरचा मान्सूनचा देशभरातला प्रवासही वेगानेच झाला. २९ जून रोजी मान्सूनने संपूर्ण देश व्यापल्याचे जाहीर केले गेले. आता नियोजित वेळेपेक्षा तीन दिवस आधीच त्याचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. परतीच्या दीर्घकालीन सर्वसाधारण वेळेनुसार १७ सप्टेंबर ही मान्सूनने राजस्थानातून परतीचा प्रवास सुरू करण्याची तारीख निश्चित करण्यात आली आहे. गेली काही वर्षे उशीराने माघारी फिरणाऱ्या मान्सूनने यंदा तीन दिवस आधीच परतीचा प्रवास सुरू केला आहे. पण मान्सून परतू लागला म्हणजे संबंधित नैसर्गिक संकटे संपली असे मात्र होताना दिसत नाही. गेल्या २४ तासांत ढगफुटी आणि पुराने उत्तराखंडमध्ये पुन्हा हाहाकार माजला आहे. उत्तराखंडची राजधानी डेहराडून येथील पर्यटनस्थळ सहस्त्रधारा येथे रात्री ढगफुटी झाली असून अनेक दुकाने वाहून गेली आहेत. या पावसामुळे डेहराडूनच्या आयटी पार्कमध्ये देखील पाणी साचले असून अनेक वाहने पुराच्या पाण्यात अडकली. यंदा निसर्गाचे भयावह रौद्ररूप अनुभवलेल्या या प्रदेशात आतातरी लोकांना सावरता येईल असे वाटत असतानाच काल रात्री पुन्हा ढगफुटी झाल्यामुळे लोक अगदी हबकून गेले आहेत. येणाऱ्या २४ तासांसाठीही या भागाला रेड अलर्ट देण्यात आला आहे. उत्तराखंडसोबत पंजाब, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि सिक्कीम या राज्यांमध्ये यंदा पावसाळ्यात निसर्गाने हाहाकार माजवला. सततच्या ढगफुटी, भूस्खलन आणि महापुरामुळे येथील लोकांना आपण ही कशाची किंमत मोजतो आहोत असा प्रश्न पडला आहे. हा हवामान बदलाचा परिणाम म्हणायचा की रस्ते, बोगदे आणि जलविद्युत प्रकल्पांसाठी केलेली डोंगरफोड या उत्पाताला कारणीभूत ठरली आहे याचा सखोल शोध घ्यावा लागणार आहे. कारणे काहीही असली तरी इथून पुढे पाऊस, ढगफुटी आदींचे अंदाज अधिकाधिक अचूक करून जीवितहानी व मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागतील. उत्तराखंडसारख्या राज्यात तर बरेच काही नव्याने उभारावे लागेल असे दिसते. तेव्हा निसर्गातील मानवी हस्तक्षेपाच्या चुका सुधाराव्या लागतील. यंदा महाराष्ट्रातही दुष्काळी मानल्या जाणाऱ्या बीड, लातूर, परभणी, अमरावती व वाशिम या जिल्ह्यांमध्येही अतिवृष्टी झाली. राज्यात काही भागांमध्ये पिकांसाठी सुयोग्य पाऊस झाला असला तरी गेल्या महिनाभरातील पावसात मोठ्या प्रमाणात शेतजमीन पाण्याखाली गेल्याने प्रचंड नुकसान झाले आहे. पावसाचे बदलते स्वरुप आता सगळ्यांनाच गांभीर्याने ध्यानात घ्यावे लागणार आहे.**

# देशाचे पंतप्रधान, विकासपुरुष नरेंद्र मोदी

नरेंद्र दामोदरदास मोदी (जन्म : सप्टेंबर १७, इ.स. १९५०) हे भारतीय जनता पक्षाचे नेते आणि २६ मे २०१४पासून स्वतंत्र भारताचे १५वे पंतप्रधान आहेत. ते ७ ऑक्टोबर, २००१पासून २२ मे २०१४ पर्यंत गुजरात राज्याचे मुख्यमंत्री होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जन्मलेले ते भारताचे पहिले पंतप्रधान आहेत. भाजपच्या गुजरात विधानसभा २००२ ते २०१२ तसेच १९९५ व १९९८ निवडणूक विजयांमध्ये मोदींचे मोठे योगदान होते. ते २००१च्या ऑक्टोबर मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री झाले व त्यानंतर सरळ चार विधानसभा जिंकत मोदींनी मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार पाहिला. २००९ लोकसभा निवडणुकीसाठीही ते भाजपचे कूटनीतीज्ञ होते.

मोदी हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे नेते आहेत व संघाचे स्वयंसेवक आहेत. गुजरातच्या विकासासाठी मोदी ओळखले जातात. त्यांच्या अर्थकारणाची प्रशंसा सर्वत्र केली जाते. परंतु २००२ च्या दंगलीत त्यांच्या भूमिकेबद्दल आक्षेप घेतले गेले.

२६ मे २०१४ रोजी त्यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती. नरेंद्र मोदी हे उत्तर प्रदेश राज्यातील वाराणसीमधून भारतीय जनता पक्षाचे खासदार होते . २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांनी वडोदरा आणि वाराणसी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यांना दोन्ही जागांवर जास्त मोठ्या प्रमाणात मतं मिळाली होती. त्यानंतर त्यांनी वडोदराची जागा सोडली. यावेळी म्हणजेच २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा वाराणसी लोकसभा मतदारसंघातूनच निवडणूक लढवली

२०२४च्या लोकसभा निवडणुकीत मोदी विरुद्ध इंडिया आघाडी अशी लढत झाली. ग्रामीण भागातील मतदार फक्त आणि फक्त मोदींना पाठिंबा देत असल्याची चर्चा करत होते लोकांच्या मते त्यांना मतदारसंघातील प्रत्यक्ष उमेदवार कोण आहे याच्याशी काही फार देणे घेणे नाही. त्यांना फक्त मोदींना पाठिंबा द्यायचा आहे. निवडणुकीच्या प्रचारात मोदींनी एका पाठोपाठ एक अशा सभा घेतल्या. या प्रचार सभेत मतदारांनी मोदी-मोदी अशा घोषणा दिल्या. संपूर्ण देशात एका बाजूला मोदी तर दुसऱ्या बाजूला इंडिया आघाडी अशी थेट लढाई होती

नरेंद्र मोदी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी गुजरातमधील वडनगर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दामोदरदास मूळचंद मोदी तर आईचे नाव हिराबेन आहे. या दोघांच्या सहा अपत्यांपैकी नरेंद्र हे तिसरे अपत्य आहे. मोदींनी किशोर वयात आपल्या भावासमवेत चहाचे दुकान चालविले. तरुणपणी महाविद्यालयीन शिक्षण घेतांनाच ते संघाचे पूर्ण वेळ प्रचारक बनले. १९९१ मध्ये कन्याकुमारी-श्रीनगर एकता यात्रेपासून त्यांचा राजकारणात उदय झाला. १९९५ मध्ये भाजपाचे राष्ट्रीय सचिव म्हणून त्यांनी पाच राज्यांची जबाबदारी निभावली. २००१ ते २००२ व नंतर २००२ ते २००७ तसेच २००७ ते २०१२ या काळात गुजरातचे मुख्यमंत्री. गुजरातमध्ये प्रचारक म्हणून संघटकाचे काम करताना त्यांनी राज्यात आपली घट्ट पकड निर्माण केली. २००१ मध्ये भाजपचे केशुभाई पटेल पायउतार झाल्यानंतर मुख्यमंत्रिपदी पहिल्यांदाच एका प्रचारकाची वर्णी लागली. संघटक एक उत्तम प्रशासक बनू शकतो, हे त्यांनी सिद्ध केले. मोदींनी सलग तीनदा सत्ता पटकावली.

शंकरसिंह वाघेला व मोदी यांनी राज्यात भाजपास सत्तेत आणण्याचे कडवे आव्हान स्वीकारत १९९५ मध्ये दोन-तृतीयांश बहुमताने पक्षाची सत्ता प्रस्थापित केली. शालेय जीवनापासून संघाच्या कार्यास वाहून घेतलेल्या मोदींनी अडवाणींच्या सोमनाथ व अयोध्या रथ यात्रा आयोजनात मोठी भूमिका निभावली होती.

राज्याची सत्ता राखतानाच राष्ट्रीय राजकारणात सतत चर्चेमध्ये राहण्याचे कसब त्यांच्याकडे आहे. भाजपचे पंतप्रधानपदाचे प्रमुख उमेदवार म्हणून अघोषित उमेदवारी ठसवण्यातही ते यशस्वी झाले.भाजपतर्फे त्यांचे सप्टेंबर २०१३ मध्ये पंतप्रधानपदाचे भावी उमेदवार म्हणून घोषणा झाली.भारतीय जनता पक्षाचे नेते नरेंद्र मोदी यांच्यासारखा साधी चहाची टपरी चालवणारा महत्त्वाकांक्षी तरुण पंतप्रधानपदाचा प्रमुख उमेदवार बनेपर्यंत मजल गाठू शकला.

फक्त २००२ मधील गुजराथमधल्यात दंगलीने त्यांच्या सर्वपक्षीय स्वीकार्यतेस 'खो' घातल्याचे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. त्यांच्या चेहर्यावरील हा काळा डाग त्यांना पंतप्रधान बनण्यापासून रोखू शकला नाही. आणि ते प्रचंड बहुमताने निवडून आले आणि भारताचे पंतप्रधान बनले.

मोदींनी २६ में २०१४ रोजी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. या पदावर पोहोचणारे रा.स्व.संघाचे ते पहिले प्रचारक तर दुसरे स्वयंसेवक होत. ते भारताचे अतिशय प्रभावी पंतप्रधान आहेत. जनतेशी थेट संवाद करणारे ते पहिलेच पंतप्रधान आहेत. नरेंद्र मोदींचा सुरुवातीचा काळ संघर्षात गेला. वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी त्यांनी घर सोडले. वयाच्या २०व्या वर्षी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नियमित सदस्य झाले. भारताचे पंतप्रधान होण्यापूर्वी नरेंद्र मोदी तीन वेळा (२००१-२०१४) गुजरातचे मुख्यमंत्री होते. मोदींच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात जन धन योजना, मेक इन इंडिया, प्रधानमंत्री सुकन्या समृद्धी योजना, अटल पेन्शन योजना, डिजिटल इंडिया मिशन इत्यादी सुमारे १०० नवीन लोककल्याणकारी योजना राबवण्यात आल्या.भारतात अमूलाग्र बदल करण्याचे स्वप्न ते योग्य ते योगदान देऊन सार्थ करत आहेत.

तसेच पंतप्रधानांच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत देशभरात २ कोटी शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या विषयावर बॉलीवूडमध्ये एक चित्रपटही तयार झाला आहे.

नरेंद्र मोदी खूप वेळेचे पाबंद आहेत. ते फक्त साडेतीन तास झोप घेतात, सकाळी ५.३० वाजता उठतात.नरेंद्र मोदी २४ तासांपैकी १८ तास काम करतात. नरेंद्र मोदींच्या दिवसाची सुरुवात योगाने होते. नरेंद्र मोदी पूर्णपणे शाकाहारी पदार्थ खातात. मोदी खूप वक्तशीर आहेत, ते दिल्लीत असतील तर सकाळी ९.३० वाजता कार्यालयात पोहोचतात.लालकृष्ण अडवाणी हे नरेंद्र मोदी यांचे राजकीय गुरु मानले जातात. १९९० च्या दशकात नरेंद्र मोदींनी अडवाणींच्या सोमनाथ ते अयोध्या रथयात्रेमध्ये मोठी भूमिका बजावली होती.तेस्वभावाने आशावादी आहेत. एका भाषणादरम्यान ते म्हणाले होते की, लोकांना अर्धा ग्लास पाण्याने भरलेला दिसतो, पण मला अर्धा ग्लास पाण्याने आणि अर्धा हवा भरलेला दिसतो.

(साभार : इंटरनेट)



## पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी

भारताचे आपले पंतप्रधान
श्री. नरेंद्रजी मोदी।
उच्च विचारसरणी राहणी मात्र साधी ।।१।।
दिवसाचे अठरा तास असतेच काम सुरू।
योग दिनाचे सत्वर महात्म्य
त्यांच्याकडून अग्रक्रमाने स्वीकारू ।।२।।
विनयशीलता, प्रेम हाच खरा धर्म।
सहकार्य, निष्ठा, आत्मनिर्भरता प्रगतीचे मर्म ।।३।।
देशप्रेम, सचोटी, सद्भावना यामुळे जगाचा मित्र
अद्ययावत माहितीचे आदान प्रदान
विकासाचा मूलमंत्र ।।४।।
अध्यात्मासवे तंत्रज्ञानाची धरली कास
उत्कृष्ट वक्तृत्व, आक्रमकता खास ।।५।।
वय मोजता आजचे अनुभवाची पंच्याहत्तरी।
जगाचे नेतृत्व करण्या एकमात्र सध्यातरी ।।६।।
तमासोबत होताच अविरत प्रकाशाचा विचार
वैश्विक शांतीचा दूत सर्वोत्तम आचार ।।७।।
अखंड नामस्मरण सत्याचे घडवितो सत्कर्म
वसुंधरेप्रती आस्था मनी भाव निष्काम ।।८।।
आदर्श मातापिता हिराबेन, दामोदरदास
पोटी सुपुत्र।
अखंड देशसेवा महत्कार्य भोगविलास
ठरले अपात्र ।।९।।
सहस्त्र हस्ते द्यावी सृजनांनी शुभेच्छा।
दीर्घायुषी व्हावे हीच सर्वोत्तम सदिच्छा ।।१०।।


**-संजीव पद्माकर काळकर,**
पनवेल



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईलचा 'नॉईज कॅन्सलेशन मायक्रोफोन'

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल फोन हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. मोबाईल फोन वापरत नाही, असा जवळपास कोणीही नाही आणि आज स्मार्टफोन आपल्या सर्व गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहेत. अन्न, वस्त्र आणि निवारा यानंतर आता मोबाईल ही माणसाची चौथी गरज बनण्याच्या मार्गावर आहे.




बराच वेळ आपण ज्या फोनवर घालवतो त्यातील काही फीचर्स किंवा त्यावर असणाऱ्या विविध टॅब्सचा वापर कशासाठी होतो हे बऱ्याच वेळा माहीत नसते. फोनच्या सर्वात खाली चार्जिंग होलच्या जवळ एक अगदी लहानसा होलही असतो. ते दिसायला खूप लहान असते, परंतु त्याचा उपयोग पाहिला असता तो प्रचंड मोठा आहे. पण बऱ्याच लोकांना या होलची स्मार्टफोन वापरात भूमिका काय आहे हे माहिती नसते. स्मार्टफोनमध्ये अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या आपल्याला माहीतही नाहीत. त्यापैकीच एक म्हणजे स्मार्टफोनच्या सर्वात खाली चार्जिंग सॉकेट जवळ एक अगदी लहानसे होल असते. परंतु, आपल्याला बऱ्याच जणांना कदाचित माहिती नसेल की त्याचे महत्त्व किती अनन्यसाधारण असे आहे. बहुतांशी हे फोनच्या खालच्या बाजूला चार्जिंग कनेक्शनच्या अगदी शेजारी असते.

या छिद्राला 'नॉईज कॅन्सलेशन मायक्रोफोन' म्हणतात. जेव्हा आपण फोनवर बोलत असतो तेव्हा हे छिद्र आपल्या आजूबाजूला होणारा आवाज रोखण्याचे काम करते. हा लहानसा मायक्रोफोन तुम्ही जर फोनवर बोलताना गोंगाटात असाल तर मागून येणारा संपूर्ण आवाज कॉलवर असणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचू देत नाही.बऱ्याच वेळा आपण ट्रॅफिकमध्ये असताना फोनवर बोलत असतो.

अशावेळी आपल्या आजूबाजूला अनेक प्रकारचा आवाज मोठ्याने चालू असतो. परंतु, तरीसुद्धा आपल्या आजूबाजूचा आवाज पलीकडच्या आपण ज्या व्यक्तीशी बोलतो त्याला ऐकू न येता फक्त आपलाच आवाज त्याला व्यवस्थित ऐकायला जातो. जेव्हा आपण अशावेळी फोनवर बोलत असतो तेव्हा आपल्या आजूबाजूला चालू असणारा आवाज थांबवण्याचे महत्त्वाचे काम या होलच्या माध्यमातून केले जाते. अशा पद्धतीने स्मार्टफोनच्या खाली असलेल्या या लहानशा होलचे मोठे कार्य आहे.

# आशयघन काव्याचे जनक वसंत बापट



## निमित्त

वसंत बापट हे सुप्रसिद्ध मराठी कवी, वक्ते, कलावंत होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. बापट यांचा जन्म २५ जुलै १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कराड याठिकाणी झाला. पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून एम.ए.(१९४८). त्यानंतर मुंबईतील 'नॅशनल कॉलेज' आणि 'रामनारायण रुईया कॉलेज' या महाविद्यालयांतून मराठी आणि संस्कृत विषयांचे प्राध्यापक होते. १९७४ पासून मुंबई विद्यापीठातील गुरुदेव टागोर अध्यासनाचे प्राध्यापक होते. साहित्य अकादमीचे ते सदस्य होते.

लहानपणापासून बापटांवर राष्ट्र सेवा दलाचे आणि साने गुरुजींच्या सहवासाचे संस्कार झाले. बिजली (१९५२) या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहावर या संस्कारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. 'सेतु' (१९५७), 'अकरावी दिशा' (१९६२), 'सकीना' (१९७२) आणि 'मानसी' (१९७७) हे त्यांचे बिजलीनंतरचे काव्यसंग्रह. बिजली ते मानसीपर्यंत त्यांच्या कवितेचा झालेला प्रवास कवी म्हणून झालेल्या त्यांच्या विकासाचा द्योतक आहे. बिजलीनंतरच्या काव्यसंग्रहांतून त्यांच्या अनुभवांचे क्षेत्रही उत्तरोत्तर अधिकाधिक विस्तारत गेल्याचे दिसते. संस्कृत आणि इंग्रजी कवितेचा प्रभावही या कवितेवर दिसून येतो. सामाजिक विषमता आणि अन्याय यांच्या तीव्र जाणिवेबरोबरच यौवनाचा अभिजात डौल, निसर्गाच्या विभ्रम-विलासांतून खट्याळ शृंगार व्यक्तविण्याची प्रवृत्ती, लावणीसारख्या जुन्या काव्यप्रकाराचे पुनरुज्जीवन करण्याचा रसिक प्रयत्न यांचा प्रत्यय त्यांच्या बिजलीनंतरच्या कवितेत येतो. त्यांच्या कवितेचे परिपक्व रूप मानसीमध्ये विशेषत्वाने जाणवते. या काव्यसंग्रहातील त्यांची कविता मितभाषी, परंतु आशयदृष्ट्या अधिक गहन अशी आहे.

संस्कृतातील अभिजातता आणि नादवती शब्दकळा बंगालीतील-विशेषत: गुरुदेव टागोरांच्या कवितेतील-मानवतावाद आणि इंग्रजी कवितेतील स्वच्छंदतावादी प्रवृत्ती यांचे ठळक संस्कार बापटांच्या कवितेवर झालेले दिसतात. बापटांची अस्सल रसिकता आणि अतिंद्रिय अनुभवांना रूपरसगंधाचे लावण्य प्राप्त करून देणारी त्यांची बहुरंगी प्रतिमासृष्टी हेही त्यांच्या कवितेचे विशेष लक्षणीय पैलू होत.'बारा गावचे पाणी' (१९६७) हा बापटांचा प्रवासवर्णनपर ग्रंथ आहे. या ग्रंथात भारताचा निसर्ग, चालीरीती, लोककला, यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांनी केले आहे. अशा या श्रेष्ठ कवीचे १७ सप्टेंबर २००२ रोजी निधन झाले.

वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा करंदीकर यांच्या संयुक्त काव्यदर्शनाचे अर्ध शतकाहून अधिक काळ देशभरात कार्यक्रम झाले. १९६९ मध्ये त्यांनी युगोस्लोव्हियातील आंतरराष्ट्रीय कविसंमेलनात भारताचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. आखाती देशात ही त्यांच्या काव्यदर्शनाचे कार्यक्रम झाले. सामाजिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक विषयांवर त्यांची व्याख्याने झाली. स इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन्स दिल्ली या संस्थेचे ते अनेक वर्षे सदस्य होते.

'चंगामंगा', 'अबडक तबडक', 'आम्ही', 'गरगर गिरकी', 'फिरकी', 'फुलराणीच्या कविता', 'परीच्या राज्यात' या त्यांनी लिहीलेल्या बालकविता.राष्ट्रसेवा दलातर्फे त्यांनी सादर केलेल्या 'महाराष्ट्र दर्शन', 'भारत दर्शन' ह्यांसारख्या यशस्वी कार्यक्रमातून तिचा प्रत्यय येतो.**(साभार : इंटरनेट)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चेहऱ्यावरील केस काढताय? लक्षात ठेवा 'या' पाच गोष्टी

सौंदर्याची काळजी घेताना चेहऱ्यावरील नको असलेले केस हा एक महत्त्वाचा मुद्दा असतो. अनेक महिला हे केस पार्लरमध्ये जाऊन काढतात, तर काहीजणी घरीच फेशियल रेझर किंवा वॅक्सचा वापर करतात. मात्र, जर तुम्ही पहिल्यांदाच चेहऱ्यावरील केस काढणार असाल, तर काही गोष्टींचं भान राखणं खूप गरजेचं आहे. अन्यथा यामुळे त्वचेवर पुरळ, मुरुमं, किंवा ॲलर्जी सारख्या त्रासदायक समस्या होऊ शकतात...



**तुमच्या त्वचेचा प्रकार जाणून घ्या**

प्रत्येकाची त्वचा वेगळी असते. कोरडी, तेलकट किंवा संवेदनशील. जर तुमची त्वचा संवेदनशील असेल, तर रेझर किंवा वॅक्सिंगमुळे जळजळ किंवा ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यामुळे केस काढण्यापूर्वी त्वचेचा प्रकार ओळखणे अत्यावश्यक आहे.

**चेहरा स्वच्छ करून घ्या**

केस काढण्यापूर्वी सौम्य फेसवॉशने चेहरा नीट धुऊन घ्या. त्वचेतील घाण आणि तेल हटवल्यामुळे छिद्र बंद होणार नाहीत आणि संसर्गाचा धोका कमी होतो. यानंतर हलकं जेल किंवा मॉइश्चरायझर वापरायला विसरू नका.

स्वच्छ आणि सुरक्षित साधनांचा वापर करा

रेझर, एपिलेटर किंवा वॅक्स जे काही वापरत असाल, ते स्वच्छ, नवीन आणि सुरक्षित असावं. गंजलेले किंवा जुने ब्लेड वापरल्यास कट्स आणि इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. वॅक्स वापरताना त्याचे तापमान योग्य आहे का, हेही तपासा.

**मॉइश्चरायझरचा वापर आवश्यक**

केस काढल्यानंतर त्वचा थोडी संवेदनशील होते, त्यामुळे हलकं, सुगंधरहित मॉइश्चरायझर लावा. यामुळे जळजळ होणार नाही आणि त्वचेला थंडावा मिळतो. केस काढल्यानंतर किमान ६ ते ८ तास मेकअप टाळावा.

**उन्हापासून संरक्षण करा**

केस काढल्यानंतर त्वचा अधिक संवेदनशील होते, त्यामुळे थेट सूर्यप्रकाशात जाणं टाळा किंवा सनस्क्रीनचा वापर करा. तसेच, वारंवार केस काढणं टाळा - यामुळे त्वचा पातळ होण्याची शक्यता असते. १५ ते २० दिवसांच्या अंतराने ही प्रक्रिया करणं योग्य ठरतं. एकंदर चेहऱ्यावर काहीही करताना आधी विचार करूनच मग कार्यवाही करणे आवश्यक आहे.

# आजपासून रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**आलिबाग : प्रतिनिधी**

गावांचा शाश्वत विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. रायगड जिह्यात बुधवारी (दि. १७ ) पनवेल तालुक्यातील पळस्पे येथे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत या अभियानाची सुरुवात होणार आहे,अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्यकाचेकारी अधिकारी नेहा भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्हाधिकारी किशन जावळे , निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यावेळी उपस्थित होते.

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्रशासन सज्ज झाले आहे. अभियानांतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम तसेच आवश्यक सूचना संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना दिल्या आहेत. या अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना राज्य शासनाकडून पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती नेहा भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन तयार करणे. सक्षम पंचायत, स्वनिधी, विकासनिधी व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे. जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे, उपजिविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ उभी करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. ३१ डिसेम्बर पर्यंत हे भयान राबविण्यात येणार आहे. या अभियानासाठी जिल्हातील प्रत्येक तालुक्यात २० ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली असून, या ग्रामपंचायतींकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. १७ सप्टेंबर रोजी सर्वा ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामसभांना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्यकाचेकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिली.

# कोमसाप तळा शाखेतर्फे गुणवंत शिक्षक आणि विशेष उल्लेखनीय कार्य पुरस्कार प्रदान

**तळा : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळातर्फे नुकते शाळा तळे मराठी येथे सन-२०२५/२६ या वर्षाचे गुणवंत शिक्षक पुरस्कार व शाखेच्या दशकपुर्ती सोहळ्यानिमित्त दहा विविध क्षेत्रातील दहा मान्यवरांना विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच आषाढी एकादशीनिमित्त पार पडलेल्या काव्यलेखन स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.हा कार्यक्रम पुरुषोत्तम मुळे यांचे अध्यक्षतेखाली झाला.



माजी समाजकल्याण सभापती गीता जाधव, रायगड भुषण प्रा.एल.बी.पाटील, जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, गणेश कोळी, सुखद राणे, अ.वि.जंगम, सिध्देश लखमदे, गंगाधर साळवी, संध्या दिवकर, संदिप जामकर आदि. व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी साहित्यिक एल.बी.पाटील यांनी सांगितले की,तळा शाखा नेहमीच अभिनव उपक्रम राबवित असून त्यांच्या उपक्रमाचे नियोजन असते.या शाखेतील चांगल्या उपक्रमांचा इतर शाखांनी आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात पुरुषोत्तम मुळे यांनी सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा गौरव केला तसेच शाखेचा दहा वर्षाचा धावता आढावा घेऊन सर्वांना शुभेच्छा दिल्या.यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच सिध्देश लखमदे यांनी गझल सादर केली.

यावेळी गुणवंत शिक्षक म्हणून प्राथमिक विभाग-प्रिया गायकवाड,माध्यमिक विभाग-अरुण खुळपे,कनिष्ठ महाविद्यालय विभाग-नागेश नायडू-कै.द.ग.तटकरे ,वरिष्ठ महाविद्यालय विभाग-प्रा.भगवान लोखंडे,जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त उल्का माडेकर,सेट परीक्षा उत्तीर्ण कौस्तूभ रिसबूड व राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अड.परेश जाधव यांचा सन्मान करण्यात आला तर राजकीय क्षेत्र-गीता जाधव, सामाजिक क्षेत्र-कृष्णा महाडिक,वैद्यकीय-डॉ.सतिश वडके,पोलिस-सतिश गवई,उद्योग-आशा सकपाळ,कृषी-रमेश शिंदे,साहित्य-शिरीष सुतार,अध्यात्मीक-सुधाकर क्षिरसागर,कला-राकेश पवार,क्रीडा-श्रध्दा गंगुत्रे ,काव्यलेखन पारितोषिक विजेते

## पेणमधून अल्पवयीन मुलाचे अपहरण

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील फणसडोंगरी येथून अल्पवयीन मुलाचे अपरहण झाले आहे. पेण पोलीस ठाणे हद्दीत ११ सप्टेंबर रोजी रोजी ७ वाजताच्या सुमारास नवीन वसाहत फणसडोगरी येथुन ता. पेण येथे फिर्यादी रा. अंतोरे-कोंप्रोली यांचा मुलगा (वय-१६ वर्षे ११ महिने) हा कॉलेजला जातो असे सांगून घरातून निघून गेला परंतु अद्याप घरी परतला नाही.

या मुलास कोणीतरी फुस लावुन पळुन नेले. याबाबत पेण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई रसाळ हे करीत आहेत.

## नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुरूड येथे शांतता समितीची बैठक

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पोलिस ठाणे तर्फे आगामी नवरात्रोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर येथील दर्यासारंग सभागृहात तालुक्यांतील नवरात्रौत्सव मंडळ पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील व शांतता समिती सदस्य आदींची बैठक नुकतीच पार पडली.

यावेळी तहसिलदार आदेश डफळ , नायब तहसीलदार संजय तवर ,पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश रसळे,मुख्याधिकारी सचिन बच्छाव , कनिष्ठ अभियंता रोशन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते . मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे मार्गदर्शन करताना म्हणाले की ,मुरुड पोलिस ठाणे हद्दीत ६३ सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ आहेत .मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी देवीची प्रतिष्ठापना करताना योग्य ती खबरदारी घ्यावी प्रत्येक मंडळाने २४ तास देवी मंडपात एक स्वयंसेवक ठेवणे बंधनकारक आहे .तसेच सतर्कतेने नियमांचे पालन काटेकोरपणे करून नवरात्रौत्सव साजरा करताना कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची सर्व नागरिकांनी काळजी घ्यावी. कारवाईची वेळ च येणार नाही याची जाणीव ठेवून आगामी नवरात्रौत्सव शांततेत पार पाडवा नवरात्रोत्सवात चलत चित्र वा अन्य देखाव्यांतुन इतर समाजाच्या भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घेण्यास सांगितले

## अलिबागेत उद्या रस्ता अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयात गुरुवार, दि.१८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता रस्ता अदालत आयोजित करण्यात आली आहे.

या रस्ता अदालतीमध्ये अलिबाग व मुरुड तालुक्यातील व या न्यायालयातील संबंधित सर्व मान्यवर विधिज्ञ, संबंधित पक्षकारांनी रस्त्यांविषयक प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्याचे असल्याने सदर दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये होणाऱ्या सुनावणीकामी संबंधित विधिज्ञ व त्यांचे पक्षकार यांनी समेटाने मिटणाऱ्या प्रकरणांमध्ये लेखी म्हणणे न चुकता सादर करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी केले आहे.

## माणगावात शासनाच्या योजनांचे लाभार्थ्यांना वितरण

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवसेना-युवासेनेच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ नागरीकांना सुलभ रीतीने उपलब्ध करून देण्यासाठी 'शिवसेना आपल्या दारी' हा लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येत असून, त्याचा एक भाग म्हणून बुधवारी ता. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता माणगाव येथे भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कुणबी भवन, येथे होणाऱ्या या सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या विशेष उपस्थितीत आणि युवासेना महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य विकासशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध योजनांचे लाभ वितरण करण्यात येणार आहे.


### जाहिर सुचना

या द्वारे, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.), पनवेल.
कार्यालयीन पत्ता - ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिरा शेजारी, टिळक रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६

संस्थेचे संबंधित खातेदार, कर्जदार व जामिनदार यांस कळविण्यात येत आहे की, संस्थेने करारनाम्यावर श्री. गणपत बाबू वाघमारे रा. डोलवली, पो. जांबरूंग, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०१ यांना एक वर्षाच्या मुदतीसाठी ''पर्यवेक्षक-वसुली'' या पदावर घेतले होते.

परंतु त्यांचा करारनाम्याचा कालावधी दि. ०३/०९/२०२५ पासून खंडीत करण्यात आलेला आहे. आता श्री. गणपत वाघमारे यांची सेवामुक्ती केल्यामुळे, संबंधितांनी याची नोंद घ्यावी व त्यांच्याबरोबर इतर कोणताही आर्थिक अथवा कर्ज वसुली संदर्भात व्यवहार करू नये तसे केल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

सही/-
(दिपक एल.राजे)
प्रशासकीय व्यवस्थापक
कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (म.) पनवेल करिता
मोबा. नं. ८४२५८९५६७५



राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा



### पनवेल महानगरपालिका
**शहर अभियंता विभाग**
**जाहिर फेर ई-निविदा सूचना**

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४५३/ ४६४/२०२५ दिनांक :- १६/०९/२०२५

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार जाहीर फेर ई-निविदा मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/208/ 2025-26 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती -अ येथील बेलपाडा गावाच्या मुख्य द्वाराची कमान बांधणे. | ४,८३,२१५/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर **दि. १८/०९/२०२५** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त- I
पनवेल महानगरपालिका


## कर्जतमधील पीएम श्री शाळेचे जि.प.च्या सीईओंकडून कौतुक



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात केंद्र सरकारच्या पीएम श्री शाळा असून त्यातील कळंब येथील शाळेला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट देऊन विविध उपक्रमची माहिती दिली. कर्जत तालुका दौऱ्यावर असलेल्या नेहा भोसले यांनी कळंब येथील पी एम श्री केंद्र शाळेला भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर विद्यार्थ्यांची प्रगती बघून आनंद व्यक्त केला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.नेहा भोसले यांनी कळंब येथील रायगड जिल्हा परिषदेच्या पीएम श्री शाळला भेट दिली. यावेळी कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील तसेच गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ नेहा भोसले यांनी या भेटी दरम्यान शाळेतील उत्कृष्ट पटसंख्या, अत्यंत आनंददायी, सुरक्षित शैक्षणिक वातावरण, शालेय स्वच्छता , विद्यार्थी गुणवत्ता याबाबतीत मुख्याध्यापक व शिक्षकांचे कौतुक केले.

शाळेत नव्याने स्थापित झालेल्या संगणक आयडियल सेंटरचा रोजच्या दैनंदिन अध्यापनात अधिकाधिक उपयोग करावा तसेच विद्यार्थी गुणवत्ता अधिक जोमाने वाढवावी अशा सूचना केल्या. अत्यंत आधुनिक सोयी सुविधायुक्त शालेय परिसर आणि गुणवंत शिक्षक यांची उपलब्धता याबाबत समाधान व्यक्त केले.

## पालीच्या नगराध्यक्षपदाचा पराग मेहता यांनी पदभार स्वीकारला


**पाली : प्रतिनिधी**

पाली येथील नगराध्यक्ष पदी पराग मेहता यांनी दि.(१६) मंगळवारी पदभार स्वीकारला. या वेळी त्यांनी नगरपंचायत प्रभागातील जनतेचे प्रलंबित प्रश्न व समस्या सोडवून जनतेला अपेक्षित विकास साधण्यास कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

वरीष्ठ नेते व पदाधिकारी यांचे मार्गदर्शन घेऊन पाली नगरपंचायतच्या माध्यमातून सर्वांगीण व शाश्वत विकास साधला जाईल. लोकाभिमुख योजना व विकासकामांना प्राधान्य दिले जाईल. राज्य व केंद्रात असलेल्या सत्तेतून पाली शहराचा कायापालट करण्यासाठी आम्ही सर्व नगरसेवक व सहकारी प्रयत्नशील असल्याचे नगराध्यक्ष पराग मेहता यांनी सांगितले.

नगराध्यक्ष मेहता यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे राकेश शिंदे, संदेश शेवाळे, ग.रा. म्हात्रे, रमेश साळुंखे, दादा कारखानीस, सुनील राऊत, इसाक पानसरे, महेश खंडागळे, भाजप नेते प्रकाश देसाई, राजेश मपारा, गीता पालरेचा, आलाप मेहता, श्रीकांत ठोंबरे, नरेश खाडे, संजोग शेठ, प्रणाली शेठ, विराज पालकर, सुशील शिंदे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

उपनगराध्यक्ष आरिफ मनियार, नगरसेवक गणेश सावंत, सुलतान बेणसेकर, जुईली ठोंबरे, मधुरा वरंडे, सुधीर भालेराव, नलिनी म्हात्रे, आशिक मणियार, सुधाकर मोरे, सुमेध खैरे पदाधिकारी, कार्यकर्ते हजर होते.



# 'स्वस्थ नारी निरोगी परिवार अभियानात जिल्ह्यातील महिलांनी सक्रिय सहभावा घ्यावा'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार जिल्हाधिकारी किशन जावळे व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील यांच्या नियोजनाने महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'स्वस्थ नारी निरोगी परिवार' हे विशेष अभियान जिल्ह्यात राबविण्यात येणार असून हे अभियान दि.१७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनिषा विखे यांनी दिली आहे.

या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी शिक्षित करणे आणि त्यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे आहे. या शिबिरांमध्ये पुढीलप्रमाणे आरोग्य तपासण्या केल्या जातील. स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची प्राथमिक तपासणी, रक्तदाब आणि मधुमेहाची तपासणी, रक्ताची हिमोग्लोबिन तपासणी, सिकलसेल रोग तपासणी, सिकलसेल कार्डाचे वितरण, तोंडाचा कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग आणि स्तनाचा कर्करोग निदानासाठी तपासणी, मासिक पाळीतील स्वच्छता व पोषण, रक्तदान मोहीम शिबीर, माता व बालकांचे संरक्षण कार्ड, क्षयरोग तपासणी, माता बालकांचे लसीकरण, निक्षय मित्र बनवण्यासाठी मोहीम, रक्तदान शिबिराचे आयोजन, इतर सामान्य आरोग्य, समस्यांसाठी समुपदेशन.

या अभियानात राज्यातील सर्व सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आरोग्य उपकेंद्रे सहभागी होणार आहेत. विशेषतः५०वर्षावरील महिलांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

या अभियानामुळे महिलांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याविषयी प्रोत्साहन मिळेल आणि गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होईल. यामुळे 'स्वस्थ नारी निरोगी परिवार' हे उद्दिष्ट साध्य होईल.


सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल तालुका यांचे समोर
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार,
ए विंग, पहिला मजला, सहकार नगर पनवेल, ता पनवेल, जि रायगड ४१०२०६

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दावा नोटीस**

पनवेल पिपल्स नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित नविन पनवेल ता पनवेल जि रायगड शाखा नविन पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्तींविरुध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापी खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वा नुसार म्हणने दाखल करण्यासाठी जाहिर नोटिस व्दारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असुन सदर दाव्या बाबत अंतीम सुनावणी ३०/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनीधी मार्फत उपस्थीत राहावे आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थीतीत दाव्याचा निकाल केला जाईल.

| अ.क्र | दावा क्रमांक | कर्जदार / सहकर्जदार | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १) | ३०३/२०२५-२०२६ | १) श्री योगेश रावसाहेब शितोळे (कर्जदार)<br>२) श्रीम सुहासिनी सुधाकर कदम (जामिनदार)<br>३) श्री चंद्रकांत तुकाराम कुदळे (जामिनदार) | घरनं. ८. श्री. गुरुकृपा हौं सोसा विर सावरकर चौक, पो. ता. पनवेल ४१०२०६<br>रुम नं.११०, बि विंग, साई सांजा मु. विचुंबे, पो.ओ.एन.जी.सी ता. पनवेल ४१०२२१.<br>फ्लॅट नं-एफ/२०३, सिध्देश्वर हौं सोसा, कामोठे, ता. पनवेल ४१०२२१. | ९४,९२०/- |
| २) | ३०४/२०२५-२०२६ | १) श्रीम वैशाली राजेश शेळके (कर्जदार)<br>२) श्रीम मनिषा शालीक पवार (जामिनदार)<br>३) श्री परेश बबन कांबरी (जामिनदार) | घर क्रं - १६४, विठ्ठल मंदीर जवळ मु. पो. आदई, ता. पनवेल ४१०२०६.<br>मु. रूम नं - २१०, ई विंग, कार्तिक रेसिडेंन्सी, गु नेवाळी, पो. आदई. ता. पनवेल, ४१०२०६.<br>मु. दहीवली, पो. सोमाटणे ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. | १,००,९३२/- |
| ३) | ३०५/२०२५-२०२६ | १) श्री राज प्रकाश जोशी (कर्जदार)<br>२) श्रीम मिताली निलेश बनसोडे (जामिनदार)<br>३) श्री परशुराम लक्ष्मण भुनेसर ( जामिनदार) | घर नं. १५६९ / बी, मु. ओवे पेठ, पो. खारघर, सेक्टर- ३२, पनवेल ४१०२१०<br>फ्लॅट नं- एफ / २०३, सिध्देश्वर हौ. सोसा., कामोठे, ता. पनवेल ४१०२२१.<br>फ्लॅट नं १०१, प्रथम अपार्टमेंट, मु. देवद, पो. ओ. एन. जी. सी ता. पनवेल ४१०२२१. | १,०२,७३०/- |
| ४) | ३०६/२०२५-२०२६ | १) श्री पंकज वासुदेव गायकर ( कर्जदार )<br>२ ) श्री अजय विठ्ठल जाधव ( जामिनदार)<br>३) श्रीम उषा सुरेश म्हात्रे (जामिनदार) | घर क्रं. १०७, मु. ओवे पेठ, पो. खारघर, सेक्टर- ३२, पनवेल ४१०२१०.<br>फ्लॅट न. ४०३, मु. ओवे पेठ, पो. खारघर, सेक्टर- ३२,पनवेल ४१०२१०.<br>मु. घर नं. २३३, वसंत विहार, मु. आकुर्ली, पो. सुकापुर, पनवेल ४१०२२१. | १,०८,५२७/- |
| ५) | ३०७/२०२५-२०२६ | १) श्री ऋषिकेश भारत खांदेकर (कर्जदार)<br>२) श्री महेश जनार्दन बाबरे ( जामिनदार)<br>३) श्रीम ज्योती कैलास भट्ट ( जामिनदार) | घर क्रं. ९८०, हनुमान मंदीर मु. ओवे पेठ, पो. खारघर, सेक्टर- ३२, पनवेल ४१०२१०.<br>मु. वरदोली पो. चिखले, ता. पनवेल. ४१०२०६.<br>फ्लॅट नं ११०, साई सदन, मु. पो. आदई, ता. पनवेल, ४१०२०६. | १,४०,४६९/- |
| ६) | ३०८/२०२५-२०२६ | १) श्री प्रमोद जनार्दन खांडेकर (कर्जदार )<br>२) श्रीम मिना मनोज साबळे (जामिनदार)<br>३) श्री केशव उंद-या काथारा (जामिनदार) | घर क्रं. ९८०, हनुमान मंदीर मु. ओवे पेठ, पो. खारघर, सेक्टर- ३२, पनवेल ४१०२१०.<br>मु. पो. करंजाडे, हनुमान मंदीर जवळ, ता. पनवेल. ४१०२०६.<br>मु. फ्लॅट नं. एफ / जी-००१, माऊली, रेसीडेन्सी, मु. नेवाळी, पो. आदई . पनवेल, ४१०२०६ | ७६,०४३/- |
| ७) | ३०९/२०२५-२०२६ | १) श्री मयुर अशोक रसाळ (कर्जदार)<br>२) श्रीम नेहा रविंद्र कदम (जामिनदार)<br>३) सतिश अर्जुन चव्हाण ( जामिनदार) | घर नं -४०३, शिवश्री सदन, पिंपळ आळी, मु. पो. आपटे, ता पनवेल. ४१०२०६.<br>रूम नं - ३०२, बी विंग, मु. विचुंबे, पो. ओ. एन. जी. सी., ता. पनवेल, ४१०२०६<br>फ्लॅट नं- ३०७, डी, विंग, बेलंतारा, मु. कराडे, पो. रसयनी, ता. पनवेल, ४१०२०७. | ८३,८८८/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्यानिशी दिली आहे.
स्थळ :- पनवेल
दिनांक :-१५/०९/२०२५
जावक क्रमांक :- २५१३/२०२५-२६

शिक्का

सही/-
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, पनवेल जि रायगड

# पनवेल महापालिकेकडून शास्ती माफीला मुदतवाढ

◆ ३० सप्टेंबरपर्यंत ९० टक्के सुट
◆ आतापर्यंत ५२४ कोटी कर जमा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी अभय योजना राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या वाढत्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्तीमध्ये अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. आता ३० सप्टेंबरपर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट राहणार आहे. अभय योजनेंतर्गत आत्तापर्यंत ५२४ कोटींचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

१६ सप्टेंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत मालमत्ता कराची थकबाकी भरल्यास करदात्यांना शास्तीमध्ये तब्बल ९० टक्के सवलत मिळणार आहे. त्यानंतर ०१ ऑक्टोबर २०२५ ते १५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान कर भरणाऱ्यांना ७५ टक्के शास्ती माफी मिळणार आहे.

महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे. करदात्यांनी ईबिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यामुळे थेट २% सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनल, वॉटर हार्वेस्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये २% सवलत दिली जाणार आहे. याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार २ टक्के करात सवलती मिळणार आहे.

कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC Tax App आणि Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाईन कर भरण्याची सुविधा मिळत आहे.

अभय योजनेंतर्गत शास्ती माफीमधील ही अंतिम मुदतवाढ लक्षात घेऊन नागरिकांनी थकबाकी त्वरित भरून, दिलेल्या शास्ती माफी व सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

### कर-मित्र चॅटबॉट सुविधा

***नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉटची सुविधा सुरू करण्यात आली आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाईन मदत पुरवेल.***

### नागरिकांना 'या' सेवा उपलब्ध

***मालमत्ता कराची थकबाकी त्वरित जाणून घेणे. आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून थेट कर भरता येणे. बिल, पावती व कर गणनेबाबत शंका निरसन. योजना, सवलत आणि अंतिम तारखांबाबत अद्ययावत माहिती. अधिक मदतीसाठी नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील 'कर-मित्र' चॅटबॉटचा वापर करावा.***

## निवडक

### प्रामाणिकपणे मोबाईल केला परत



**पनवेल :** प्रवासादरम्यान इको गाडीत विसरलेला महागडा मोबाईल चालकाने प्रवाशांची ओळख पटवून पनवेल शहर पोलीस ठाण्यात अधिकारीवर्गाच्या समोर परत केल्याने इको चालकाचे कौतुक होत आहे. अब्दुल अलीम रा. खालापूर हा इको गाडी (एमएच ०६ बी डब्लू ४१०२)तून प्रवास करत असताना त्याचा महागडा मोबाईल तो गाडीतच विसरला ही बाब इको चालक सचिन देशमुख राहणार सुधागड यांच्या लक्षात येताच त्यांनी संबंधित व्यक्तीशी संपर्क साधून मोबाईल पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार व इतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत अब्दुल अलीम याना परत दिल्याने त्यांचे पोलीस अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे.

### विद्यार्थ्यांची मोफत रक्ततपासणी



**मोहोपाडा :** रसायनी परिसरातील रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे येथे प्रायमा व आरके लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील विद्यार्थ्यांची मोफत रक्ततपासणी शिबिराचे आयोजन मंगळवारी (दि.१६) करण्यात आले होते. या वेळी ३४ विद्यार्थांची मोफत रक्तगट तपासण्यात आले. या वेळी आरके लॅबचे रोहिणी खाने व दिपीका पाटील, शाळेचे मुख्याध्यापक पुंडलिक पाटील, शहाजी अभिमन्यू घायतिडक, जागृती जीवन तेलंगे यांनी प्रायमा व आरके लॅब यांचे आभार मानले.

### हरिभाऊ घरत यांचा स्मृतिदिन

**उरण :** राजयोगी भर्तरीनाथ, धाकले खोत, राजयोगी मच्छिंद्रनाथ सारख्या कादंबऱ्या ज्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून अवतरल्या ते कादंबरीकार व कथाकार कै. हरिभाऊ घरत यांचा द्वितीय स्मृतिदिन त्यांच्या भेंडखळ येथील निवासस्थानी सोमवारी (दि.१५) करण्यात आला. या वेळी त्यांचे सुपुत्र व गायक मंगेश घरत यांनी भजनाचे आयोजन केले होते. या वेळी हरिनाम मंडळ, भेंडखळचे व्यवस्थापक के.एस.ठाकूर, प्रबोधन कवी प्रकाश ठाकूर, कवी भगवान ठाकूर, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र नाईक व गावांतील अनेक मान्यवर उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी कै. हरिभाऊ घरत यांचे साहित्य व त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

## पनवेलमध्ये गांजा हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी केला मोठ्या प्रमाणात गांजा हस्तगत केला असून या प्रकरणी एका इसमास ताब्यात घेण्यात आले आहे .

शहरातील सोसायटी नाका ब्रिजखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक पटेल, उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार योगेश दिवेकर, परेश म्हात्रे, अविनाश गंथडे, विनोद देशमुख, महेंद्र वायकर, नाईक सम्राट डाकी आदींचे पथक ग्रस्त घालीत असताना सदर ठिकाणी आरोपी कुमार तीपा रेड्डी (वय ४०, धंदा गांजा विक्री, रा. इंदिरानगर झोपडपट्टी पनवेल) हा संशयस्पदरित्या फिरताना आढल्याने त्याला ताब्यात घेतले.

त्याच्याकडे १६५०० रुपये किमतीचा ८२५ गॅम गांजा हा मुद्देमाल त्याच्याकडून हस्तगत करण्यात आला आहे व त्याच्याविरोधात एनडीपीएस अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.



## पनवेल मनपाच्या सर्व आरोग्य केंद्रांतर्गत आज विशेष शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व २६ आरोग्य केंद्रांतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरांचा महापालिका क्षेत्रातील महिलांनी व बालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. आयुक्त महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या आरोग्य शिबिराच्या नियोजनासाठी नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकिस उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर उपस्थित होते. स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत १७ सप्टेंबर पासून सुरू होणाऱ्या आरोग्य शिबरीरास पालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त महिलांनी व बालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## ब्रिजवरून ट्रक कोसळला

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून ज्वारी घेऊन जाणारा ट्रक पलटी झाल्याची घटना मंगळवारी (दि.१६) पहाटे सहाच्या सुमारास घडली. या अपघातात ट्रकचालकाचा मृत्यू झाल्याची माहिती खांदेश्वर पोलिसानी दिली. (केए ३२ सी ३७१८) या क्रमांकाचा ज्वारीने भरलेला ट्रक वाशीच्या दिशेने मुंबई-पुणे एक्सप्रेस वेने जात होता. १६ सप्टेंबर रोजी पहाटे सहाच्या सुमारास नवीन पनवेल सेक्टर सहा जवळील नेवाळीकडे जाणाऱ्या ब्रिजजवळ आला असता ट्रक ब्रिजवरून खाली कोसळला. हा अपघात एवढा मोठा होता की या ट्रक दोन चाक वर अडकले आणि ट्रक खाली कोसळला. या अपघातात ट्रक वरील चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. सुदैवाने ज्यावेळेस ट्रक ब्रिज वरून खाली कोसळला त्यावेळेस या ठिकाणाहून वाहनांची रहदारी कमी होती अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

**चालक जागीच ठार**



## भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये मंगळवारी राष्ट्रीय अभियंता दिनानिमित्त भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, शहर अभियंता संजय कटेकर, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, उप अभियंता विलास चव्हाण, रचना निरीक्षक राजेश कर्डिले, आरेखक नितीन हुद्दार, विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील, स्वछता विभाग प्रमुख अनिल कोकरे, महापालिकेतील सर्व विभागातील अभियंता उपस्थित होते.

भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांनी कावेरी नदीवरती बांधलेले कृष्णराज सागर धरण हे जगविख्यात आहे. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस अभियंता दिवस म्हणून साजरा केला जातो.

या वेळी मार्गदर्शन करताना आयुक्त मंगेश चितळे यांनी सर्व अभियंत्याना सांगितले, सर विश्वेश्वरय्या यांच्यासारखे सर्वांच्या लक्षात राहील, असे काम करा. या वेळी उपस्थित अभियंत्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन मॉडेल मेकिंग स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे मंगळवारी आंतरमहाविद्यालयीन मॉडेल मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते.

संस्कृती - जिथे परंपरा देते सर्जनशीलतेला प्रेरणा या विषयावर आधारित स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरणास अनुकूल अशा साहित्यांचा वापर करून देखणी व कल्पक मॉडेल्स सादर केली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. रिजवाना मोमिन व भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच त्यांची उपस्थिती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली. या स्पर्धेसाठी मार्गदर्शन मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या विभागप्रमुख डॉ. रीत ठुले यांनी केले तसेच त्यांनी संपूर्ण स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन केले.



या स्पर्धेचे आयोजन व संचालन प्रा. रेहनुमा खान आणि प्रा. आकांशा त्रिपाठी यांनी अतिशय सुरळीतपणे पार पाडले. महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांनीही या स्पर्धेमध्ये सक्रिय सहभाग घेतला व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, पारंपरिक मूल्यांप्रती आदर आणि पर्यावरणाविषयीची जाणीव या स्पर्धेमुळे प्रकर्षाने दिसून आली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल मॅनेजमेंट स्टडीज विभागाचे व विजेतांचे अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी मॅनेजमेंट स्टडीज विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार केले.

## मोहोपाड्याच्या राजाला भक्तिभावाने निरोप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या... अशा एक ना अनेक आरोळ्या देत मोहोपाडा येथील श्री गणेश युवक क्रीडा मंडळाच्या पाच दिवसीय गौरा गणपती राजाचे एकोणिसाव्या वर्षीही भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले. सायंकाळी मोहोपाडा येथून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होताच परिसरातील महिलांनी पारंपारीक नाच केला.

यानंतर तरुणांनी गौरा गणपतीसमोर विविध इव्हेंटच्या माध्यमातून कलांचे सादरीकरण केले. या वेळी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. कलेचे सादरीकरण झाल्यानंतर जल्लोषात गौरा गणपती मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. या मिरवणुकीत मोहोपाड्यातील लहानथोर सर्वांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. या गौरा गणपतीसमोर गेल्या पाच दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरणात मोहोपाड्यातील गौरा गणपतीला निरोप देण्यात आला. बाप्पाला निरोप देताना लहान मुलांसह मोहोपाडाकर भावूक झाले होते. पावसाने उघडीप दिल्याने विसर्जन सोहळ्यात कोणताही विघ्न आला नाही, मात्र लाडक्या एकदंताला निरोप देताना भाविकांचा कंठ दाटून आल्याचे चित्र विसर्जन स्थळी पहावयास मिळाले.

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या च्या जयघोषात श्री गणेश युवक क्रीडा मंडळाच्या सदस्यांनी पुष्पवृष्टी करत गौरा गणरायाला मोहोपाडा तलावावर भक्तिभावाने निरोप दिला.

## गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षकांच्या भूमिका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून गव्हाण येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये सोमवारी (दि.१५) अभिरूप शाळा भरवून विद्यार्थ्यांनीच शिक्षकांच्या भूमिका साकारल्या व शिक्षकांचा अभिनव पद्धतीने केला सन्मान.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापका पासून तर शिपायांपर्यंत सर्व भूमिका साकारून शिक्षकांचा यथोचित सन्मान केला. शिक्षकांच्या भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांनी तयारीनिशी वर्गनिहाय अध्यापन केले.

या दिवशी विद्यार्थी मुख्याध्यापिका झालेल्या नंदिनी भगवान मोरे (१० क), उपमुख्याध्यापिका शौर्य कोळी व पर्यवेक्षिका रेवती भोसले तसेच जुनिअर कॉलेजच्या आजच्या दिवसाचा विद्यार्थी प्राचार्या यांनी आजच्या दिनी वेळापत्रक निहाय नियोजन करून संपूर्ण दिवस अभिरुप शाळा चालविली.

अभिरूप शाळेच्या तासिका संपन्न झाल्यानंतर झालेल्या समारंभात शाळेच्या विद्यार्थिनी मुख्याध्यापिका नंदिनी मोरे, विद्यार्थी उपमुख्याध्यापक शौर्य कोळी, विद्यार्थीनी पर्यवेक्षिका रेवती भोसले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले, अन्य सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक दिन विभाग प्रमुख चारुशीला ठाकूर व शितलकुमार म्हात्रे, ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक दिन विभाग प्रमुख राजेंद्र चौधरी व संजय उगले यांनी विशेष परिश्रम घेतले.

सर्व शिक्षकांसाठी विद्यालयाच्या उपशिक्षिका संपदा म्हात्रे व ज्युनिअर कॉलेज शिक्षिका ॲड. डॉ.सुवर्णा किर्लोस्कर यांच्या वतीने लेखणी भेट देण्यात आल्या. तर ज्युनिअर कॉलेज शिक्षक जयराम सोनटक्के यांचे वतीने स्नेहआहार देण्यात आला. सागर रंधवे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले तर सांस्कृतिक विभागप्रमुख एच.आर. पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात टू-मिनिट पिच स्पर्धा उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१५) कॉलेजमधील उद्योजकता विकास कक्षच्यावतीने आयोजित करण्यात आलेली टू-मिनिट पिच स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेत एकूण २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्ये विकसित करणे व त्यांना आपल्या व्यवसाय कल्पना प्रभावीपणे मांडण्यास प्रोत्साहन देणे हा होता. या स्पर्धेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास २ मिनिटांत आपली व्यवसाय किंवा उत्पादन कल्पना सादर करण्याची संधी देण्यात आली होती. या स्पर्धेतून अनेक नवकल्पना समोर आल्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व प्रभावी पद्धतीने आपापल्या कल्पना मांडल्या व परीक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले.

या स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे: प्रथम क्रमांक, आशिष प्रजापती तृतीय वर्ष वाणिज्य विभाग, द्वितीय



क्रमांक, निदा पटेल प्रथम वर्ष वाणिज्य विभाग, या उद्योजकता विकास कक्षाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचेतना निर्माण झाली असून भविष्यातील यशस्वी उद्योजक घडविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित झाली आहे. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल उद्योजकता विकास कक्षाचे व विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. तनुजा सुमन यांनी केली तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रम

## रायगडातील ११३ गावांमध्ये सेवा पर्व

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकारने ’धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील ११३ गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवला जात आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर पर्यंत या अभियानास सेवापर्व तसेच आदी सेवा अभियान म्हणून संबोधले जाणार आह, अशी माहिती रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मंगळवारी (दि. १६) पत्रकार परिषदेत दिली.



आदिवसी सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीमती तेजस्विनी गलांड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यावेळी उपस्थित होते.

आदिवासी गावांचा सर्वांगीण विकास करणे आहे. शासनाच्या सर्व योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहचवणे हे या कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे. यामध्ये महिला व बाल कल्याण, ग्रामीण विकास, कृषी, आरोग्य, शिक्षण यासारख्या १७ विमागांच्या २५ योजनांचा समावेश आहे. या योजनेसाठी निवडलेल्या गावांमध्ये व्हिलेज ॲक्शन प्लॅन (व्हीएपी) तयार करण्यात येणार आहे. गावकरी एकत्र येऊन त्यांच्या गरजा ओळखून विकास आराखडा तयार करून शासनाकडे पाठवणार आहेत. जिल्ह्यात एकूण ११३ गावे निवडली आहेत. यामध्ये कर्जतालुक्यातील २४, पनवेल १०, उरण ०२, खालापूर १०. पेण २०, अलिबाग १३, मुरुड २, रोहा ९, सुधागड २, माणगाव २, तळा १, श्रीवर्धन ३, मसळा १ आणि महाड तालुक्यातील २ गावांचा सामावेश आहे.

या अभियानात शासकीय अधिकारी आदी कर्मयोगी म्हणून, तर शिक्षक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नेते आदी सहयोगी म्हणून काम करतील. आदिवासी समाजातील उत्साही तरुण-आदी साथी म्हणून सहभागी होणार आहेत. एक खिडकी केंद्रः गावांमध्ये आदी सेवा केंद्र सुरू केली जातील. या केंद्रांमार्फत आरोग्य, शिक्षण, पोषण आणि जल-स्वच्छता यांसारख्या सेवा उपलब्ध होतील, ज्यामुळे ग्रामस्थांचा थेट शासनाशी संपर्क होईल आणि त्याच्या सगस्यांचे निराकरण होईल. ही योजना प्रभावीप्रणे राबविण्यासाठी जिल्ह्यात ७० प्रशिक्षक नेमण्यात आले आहेत. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सदर अभियानास ’सेवा पर्व’ तसेच आदी सेवा अभियान म्हणून संबोधले जाणार आहे, अशी महिती जिल्हाधिकरी किशन जावळे यांनी दिली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किशन जावळे असून, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले या सहअध्यक्ष आणि समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. तालुका स्तरावर गटविकास अधिकारी नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. पेण येथील आदिवासी प्रकल्प अधिकारी आत्माराम धाब आणि सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीमती तेजस्विनी गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविले जात आहे.

# इंदापूरमध्ये आगीत भस्मसात दुकानांच्या मालकांना पतसंस्थेतर्फे मदत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील इंदापूर बाजारपेठेतील आगीत भस्मसात झालेल्या दुकानांच्या दुकानदारांना रायगड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील नामांकित पतसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेतर्फे प्रत्येकी १० हजार रुपयांची आर्थिक मदत सोमवारी (दि.१५) देण्यात आली.

इंदापूर बाजारपेठेत मुंबई - गोवा महामार्गालगत असणाऱ्या दुकानांना शनिवार ६ सप्टेंबर रोजी मध्यरात्री आग लागली होती. या आगीत तीन दुकाने जळून पूर्णपणे भस्मसात होऊन या दुकानदारांचे लाखो रुपयांचे नुकसान होऊन त्यांच्यावर मोठे संकट कोसळले. या संकटग्रस्त दुकानदारांना सहकारातून समृद्धीकडे व समृद्धीकडून अपादग्रस्त, पूरग्रस्त तसेच संकटग्रस्तांच्या मदतीसाठी नेहमीच धावून जाऊन त्यांना मदतीचा हात देणारी माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था या संस्थेतर्फे आगीत भस्मसात झालेल्या दुकानांचे दुकानदार पारस पेकाजी परमार, अमित गणेशमल ओसवाल व शाम कदम यांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा आर्थिक मदतीचा धनादेश संस्थेचे चेअरमन आनंदशेठ यादव यांच्या हस्ते व संचालक दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, उदय म्हशेळकर, संदीप खरंगटे, व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, इंदापूर शाखाधिकारी राजेश सकपाळ, सहाय्यक मयूर केकाणे व इंदापूर येथील स्वल्पबचत प्रतिनिधी मनोज अहिरे यांच्या उपस्थितीत धनादेश देण्यात आला.

माणगाव ग्रामीण पतसंस्थेने या संकटग्रस्त दुकानदारांना मोलाची आर्थिक मदत केल्याने या सर्व दुकानदारांनी पतसंस्थेचे मनापासून ऋण व आभार मानले.



# तळा कोमसापच्या काव्यलेखन स्पर्धेत सायराबानू चौगुले यांना द्वितीय क्रमांक

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळा यांच्यातर्फे शिक्षक दिनानिमित्त गुणवंत शिक्षक सन्मान सोहळा रविवारी राजिप मराठी मुलींची शाळा तळा आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या काव्यलेखन स्पर्धेत माणगाव येथील प्राथमिक शाळेच्या शिक्षिका तथा प्रसिद्ध लेखिका व कवयित्री सायराबानू वजीर चौगुले यांना द्वितीय क्रमांकाचे आकर्षक सन्मानचिन्ह,शाल व प्रमाणपत्र बक्षीस देऊन कोमसापचे रायगड जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, रायगड भूषण एल.बी.पाटील, केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी, रायगड भूषण सुधीर शेठ,जिल्हा समन्वयक सुखद राणे, माजी समन्वयक अ.वि.जंगम, ज्येष्ठ पत्रकार पुरषोत्तम मुळे, ॲड. परेश जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

कवयित्री सायराबानू चौगुले या माणगाव येथील प्राथमिक शाळेच्या शिक्षिका असून त्या उत्कृष्ठ लेखिका व कवयित्री आहेत. त्यांची अनेक विविध विषयांवरील पुस्तके व कविता संग्रह प्रकाशित झाली आहेत. एक गुणवंत शिक्षिका म्हणून त्यांची ओळख रायगड जिल्ह्यात सर्वत्र आहे. शिक्षिका म्हणून काम करीत असताना त्यांनी अनेक विद्यार्थी आपल्या तालमीत घडविले आहेत. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण देत असताना नेहमीच त्यांनी संस्कारक्षम शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे.

# कुत्र्याच्या हल्ल्यात जखमी घोरपडीला जीवदान

**चौक : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात विनी इंजिनिअरिंगच्या आवारात घडलेल्या घटनेत लॅब्रेडोर जातीच्या मॅक्स नावाच्या सुरक्षा कुत्र्याने अचानक आलेल्या घोरपडीवर हल्ला केला. काही वेळ भुंकून आवाराबाहेर घालवण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर मॅक्सने घोरपडीला चावा घेऊन जखमी केले. प्रतिकार म्हणून घोरपडीनेही आपल्या शेपटीने मॅक्सवर फटके दिले, त्यामुळे परिसरात थरारक वातावरण निर्माण झाले होते. हे बघण्यास सगळ्यांना उत्सुकता होती, पण मुक्या जीवाला वाचविण्याचा प्रयत्न झाला नाही.

कुत्र्याच्या हल्ल्याने घोरपड अर्धमेली झाल्यावर मॅक्स श्वान शांत झाला. यावेळी तेथून जाणारे निलेश कुदळे या समाजसेवकाने मॅक्सला आवरले आणि जखमी घोरपडीला शिताफीने ताब्यात घेतले. निलेश कुदळे यांनी या परिसरात सामाजिक काम करणाऱ्या हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली.

गुरुनाथ साठेलकर यांनी प्रवीण शेंद्रे यांच्या मदतीने घोरपडीवर प्राथमिक उपचार केले. पाणी व अल्प आहार दिल्यानंतर घोरपडीला सुरक्षित पिंजऱ्यात ठेवण्यात आले. काही तासांच्या विश्रांतीनंतर ती पुन्हा ठणठणीत दिसू लागली. अखेरीस वनक्षेत्रात तिला सोडण्यात आले.

या घटनेत सुरक्षाकामी पाळलेल्या मॅक्सने आपली जबाबदारी पार पाडली असली, तरी निलेश कुदळे व हेल्प फाउंडेशनच्या माध्यमातून दाखवलेले प्राणीप्रेम विशेष कौतुकास्पद ठरले. खोपोली परिसरात त्यांचे कौतुक होत आहे. त्यांनी एका जखमी प्राण्याला जीवदान देत निसर्गातील प्रत्येक जीवाला जगण्याचा अधिकार आहे, असा जणू संदेश या निमित्ताने दिला.



# भाजप युवा मोर्चा म्हसळा तालुका अध्यक्षपदी योगेश महागावकर

**म्हसळा : प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चा म्हसळा तालुक्याचे अध्यक्ष पदाची जबाबदारी नुकतीच योगेश महागांवकर यांची नियुक्ती करुन देण्यात आली. कार्यक्रमात या वेळी रायगड जिल्हा भाजपाचे युवामोर्चाचे अध्यक्ष निलेश कुडलिक थोरे-पाटील यांचे हस्ते महागावकर याना नियुक्ती पत्र देण्यात आले.




या वेळी माजी आमदार पंडित पाटील, भाजप नेते सतीश धारप, जिल्हा सरचिटणीस प्रशांतजी शिंदे, वैकुंठशेठ पाटील, ॲड. महेश मोहिते, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्राताई पाटील, महीला आघाडीच्या हेमा मानकर, म्हसळा तालुका अध्यक्ष महेश पाटील, माजीअध्यक्ष शैलेशकुमार पटेल, माजी तालुका अध्यक्ष तुकाराम पाटील, युवा मोर्चा दक्षिण रायगड उपाध्यक्ष निलेश मांदाडकर आणि दक्षिण रायगडचे सर्व जिल्हा पदाधिकारी सर्व तालुका अध्यक्ष, सर्व सेलचे मोर्चा अध्यक्ष या सगळ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी युवामोर्चाचे नवनियुक्त अध्यक्ष योगेश महागांवकर यांनी भारतीय जनता युवा मोर्चा ही भारतीय जनता पार्टी (भाजप) ची युवा शाखा आहे. ही जगातील सर्वात मोठी राजकीय युवा संघटना आहे. संघटनेच्या श्रेष्ठत्वाचे भान ठेऊन राष्ट्रीय कार्यक्रमांचे धोरण जनमानसांत रुजवीन, तसेच तालुक्यात युवा मतदारांची, गरीब, बहुजन वर्ग, तालुक्यांत शिक्षण, आरोग्य, जलजिवन मिशन योजनांची केंद्र-राज्य शासनाची कामे शेवटच्या घटकापर्यंत पोहचविन, असे या वेळी सांगितले.

# ...तर चौक परिसराची ‘प्रगती’ होईल!

**चौक : प्रतिनिधी**

पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सद्या प्रगतीपथावर सुरू आहे, याच मार्गावर चौक हे महत्वाचे रेल्वे स्टेशन आहे,मात्र त्याच्या प्रगती कडे लक्ष देण्याची विनंती स्थानिक लोक प्रतिनिधी यांना करण्यात येत आहे.



या मार्गावरून अनेक गाड्या जात येत आहेत. यात माल गाडी,एक्सप्रेस यांचाही समावेश आहे. पुणे-मुंबई-पुणे ही प्रगती एक्सप्रेस कर्जत कल्याण जाणारी आता याच मार्गाने पनवेल वरून छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकावर जात असते. पुणे मुंबई पुणे ही प्रगती एक्सप्रेस चौक येथे थांबल्यास या परिसराचा कायापालट होण्यास विलंब होणार नाही, चौक हे मध्यवर्ती ठिकाण आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव आहे, जग प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण माथेरान च्या पायथ्याशी असून नवी मुंबई महानगर पालिका व पनवेल महानगर पालिका यांच्या खारघर व कामोठे विभागाला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण आहे.

चौक ही ग्रामीण भागातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे.चौक च्या परिसरातील गावांत धनिकांची जमीन आहे, अनेक उत्पन्नाची साधने उपलब्ध आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार हा चौक गावातून जातो, द्रुतगती मार्ग हा साधारण तीन ते चार किमी अंतरावर आहे. या परिसरातून कर्जत येथे व पुढे कल्याण नाशिक जाणारा रस्ता देखील चौक वरून जातो, चौक वरून पनवेल आणि खोपोली समान अंतरावर आहेत, खोपोली, खालापूर येथील नागरिकांना चौक मार्गेच मुंबई कडे जाता येते. चौक पासून सहा किमी. अंतरावर पाताळगंगा औद्योगिक वसाहत आहे, त्याच मार्गावर सावरोली, पुढे ढेकू, साजगाव, छातीशी विभाग हा औद्योगिक विभाग आहे.

या परिसरातून रोज पनवेल, नवी मुंबई, ठाणे व मुंबई येथे जाणारा कामगार वर्ग, विविध शैक्षणिक क्षेत्रात जाणारे विद्यार्थी, कामगार, त्या परिसरात जाणारे रुग्ण, न्यायालयीन कामकाज साठी जाणारे वकील, फिर्यादी, खरेदी विक्रीचा व्यवसाय करणारे व्यापारी, दैनंदिनी कामकाज करणारे शेकडो लोक पनवेल कडून मुंबई कडे जाताना दिसत आहेत. चौक हे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे मुंबईला जाणारी प्रगती एक्सप्रेस चौक येथे थांबल्यास त्याचा फायदा अनेकांना होईल, चौक वरून साधारण दीड तासात छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकावर गाडी पोहचते, याचा फायदा सर्वच क्षेत्रातील प्रवाशी यांच्यासाठी होईल,चौक व त्याच्या आसपास गावांत घरकुल योजनांचे टॉवर उभारण्यात येत आहेत, सद्या ही कामे प्रगती पथावर आहेत.

चौक परिसरात पर्यटन, पावसाळी पर्यटन आहे, त्या विकासाला चालना मिळण्यास वेळ लागणार नाही. पुणे येथून निघालेली प्रगती एक्सप्रेस चौक येथे सकाळी ९.३५ पोहचते, तर छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकावर सकाळी १०.५५ वाजता पोहचते. तर संध्याकाळी ५.५५ वाजता चौक येथे पुणे येथे जाण्यास येते. तर नांदेड पनवेल ही सकाळी ८.४० वाजता चौक येथून पनवेल कडे जाते, व संध्याकाळी ४.२० वाजता पुन्हा नांदेड साठी प्रस्थान करते. या शिवाय साप्ताहिक गाड्या, दररोज पाच ते सहा एक्सप्रेस गाड्या येथून मार्गस्थ होतात, यात कोकणातून गोवा जाण्यासाठी देखील गाडी आहे. १५ ते सोळा माल गाड्यांचा प्रवास होत आहे. पनवेल कर्जत ही प्रवासी सेवा सुरू झाली होती, ती सुरु होण्याचे श्रेय घेण्यास सर्वांच्या उड्या पडल्या होत्या, पण ती बंद झाल्यावर कुणीही चकार शब्द काढला नाही.

खासदार श्रीरंग बारणे व आमदार महेश बालदी यांना निवेदन देऊन चर्चा करण्यात आली आहे. या परिसराची प्रगती होण्यास त्यांनी सहकार्य करावे अशी मागणीदेखील झाली आहे, त्यांचे सहकार्य लाभल्यास प्रगती आणि नांदेड गाड्यांना थांबा मिळेल व या परिसराची प्रगती होण्यास वेळ लागणार नाही.

# आधुनिक तंत्रज्ञान अन् मेहनतीच्या जोरावर फुलवले नंदनवन

## प्रयोगशील शेतकरी भगवान अहिरेंची यशोगाथा

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील बहुतांश शेती नापीक व ओसाड आहे. मुबलक पर्जन्यवृष्टी होऊनही येथे केवळ भात शेती केली जाते. उत्पन्नापेक्षा उत्पादन खर्च अधिक म्हणजे शेती तोट्यातच आहे. मात्र अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये पोलादपूर तालुक्यातील डोंगरावर वसलेल्या गोवेले गावातील प्रयोगशील शेतकरी भगवान कोंडीराम अहिरे (वय ५५) यांनी आधुनिक तंत्रज्ञान व मेहनतीच्या जोरावर आपल्या शेतीमध्ये नंदनवन फुलवले आहे. सेंद्रिय शेती, दुग्ध व्यवसाय कुक्कुटपालन सुद्धा ते करत आहेत.



भगवान अहिरे यांनी १९९० पासून शेती व्यवसाय सुरु केला. ते आपल्या २५ एकर शेतीमध्ये विविध प्रकारची शेती करत आहेत. चार सूत्री भात लागवड, सेंद्रिय हळद लागवड त्याच बरोबर उन्हाळ्यामध्ये भुईमूग, चवळी, हरभरा भाजीपाला इत्यादी पिके घेत आहेत. दुग्ध व्यवसाय, कुकूटपालन, सेंद्रिय शेती, उन्हाळा मध्ये बागायती शेती, दोन एकरमध्ये आंबा लागवड केली आहे. सद्या त्यांच्याकडे २०० आंब्याची झाडे आहेत.

शिवाय गाव हगणदरीमुक्त करण्यासाठी ते प्रयत्न केले आहेत. आजुबाजुच्या शेतकऱ्यांना शेतीविषयक नेहमी मार्गदर्शन करतात. त्यांचा आदर्श परिसरातील शेतकऱ्यांनी घेतला असुन ते सुध्दा आधुनिक शेती व्यवसायाकडे वळले आहेत.

घरची परिस्थिती तशी व बेताची होती. वडिल पुर्वीपासुन समाजसेवेत आणि समाजसेवा करत. २५ एकर शेतीमधील १० एकर शेतीमध्ये भात नाचणी व इत्यादी पिके घेत असत व जोड व्यवसाय म्हणुण दुग्धव्यवसाय होता. भगवान अहिरे यांचे प्राथमिक शिक्षण गावाताच झाले नंतर पुढील शिक्षणासाठी गावापासुन शहरी भागाकडे पाच किलोमीटर अंतर कापावे लागायचे व सोबत २० लिटर दुध डोक्यावर घेऊन जावे लागयचे. घरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांनी शिक्षण अर्धवट सोडुन दिले. त्यांनी लग्न झाल्यावर असे ठरवले की आपण आता आधुनिक शेती करायची. आणि सुरवातीला लगेच मोठा व्यवसाय करणे शक्य नव्हते म्हणुन ठरवले की शेतीला आधारित जोड व्यवसाय सुरू करावा. मग शेती मध्ये २००३ पासुन उन्हाळी हंगामामध्ये भुईमुग, मका, टॉमेटो, गहु, मिरची, फरसबी व कलिंगड इत्यादी पिके घेण्यास सुरवात केली. २००४ मध्ये ३ महिन्यात तब्बल ६० हजार रूपये किमतीची फरसबी वाशी बाजारपेठेत येथे पाठवली होती. हे सर्व करत असताना त्यांना पत्नीची साथ मिळाली, पत्नीचे निधन झाल्यावर मुलांची व बहिणीची साथ मिळाली.

मागेल त्याला शेत तळे या योजने अंतर्गत २८÷३०चे शेततलाव खोदले आहे. त्यानंतर शेतीपुरक असा दुग्ध व्यवसाय सुरू करण्याचे ठरविले. सुरवातीला घरची एक म्हैस होती. मग २०१७ पासुन स्वदेस फाऊंडेशन या सामजिक संस्थेच्या मार्गदर्शनाने दुग्ध व्यवसाय सुरू केला. आता त्यांच्याकडे ११ म्हशी व ५ गायी आहेत. त्याच बरोबर त्यांनी कुक्टपालन व फळबाग लागवड देखील केली आहे. भाजी आणि भात लागवडीसाठी जास्तीत जास्त शेणखत व गांडुळखत या शेंद्रियखत मिळत आहे. रासायनिक खताचा वापर न करता ते सेंद्रिय शेती करत आहे. तसेच आधुनिक व पारंपारिक बियाणे वापरत आहेत.

### ◆ पाणीटंचाईवर मात

***तुकड्यांची शेती पाणीटंचाई यामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकरी शेती करत नाहीत, मात्र भगवान अहिरे यांनी आपल्या जमिनीची चांगल्या पद्धतीने निगा ठेवली. पोलादपूर मध्ये पाणी टंचाई आहे. परंतु कमी पाण्यामध्ये सुद्धा त्यांनी शेती करणे सोडले नाही आहे. सोबतच ते ठिबक सिंचन चा वापर करत आहेत. जोडीला शेततळे सुद्धा बांधले आहे.***

### ◆ माकडांपासून मिळवले संरक्षण

***नावीन्य पूर्ण काम म्हणजे त्यांनी शेतीचे माकडांपासून संरक्षण व्हावे म्हणून सोलर कुंपण केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा सखोल अभ्यास त्यांच्या मुलाला सुजल अहिरे यांना असल्यामुळे हे शक्य झाले. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजना त्यांचा लाभ ते घेत आहेत. आणि त्यांचा आदर्श परिसरातील शेतकऱ्यांनी घेतला आहे.***

### ◆ अनेक पुरस्कार

***भगवान अहिरे यांना पंचायत समिती व कृषी विभाग कडून शेती निष्ठ शेतकरी पुरस्कार मिळाला आहे. तसेच विविध सेवाभावी संस्थांचे त्यांना पुरस्कार मिळाले आहेत. शेतीतील नवनवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी ते विविध अभ्यास दौरेदेखील करत असतात.***

# बुद्धिबळपटू वैशालीचे ऐतिहासिक यश

## ग्रँड स्विस स्पर्धेच्या जेतेपदासह ‘कँडिडेट्स’साठी पात्र

**समरकंद : वृत्तसंस्था**

भारताची ग्रँडमास्टर आर. वैशालीने ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेच्या महिला गटाचे विजेतेपद राखण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. ही स्पर्धा सलग दोन वेळा जिंकणारी ती पहिली बुद्धिबळपटू ठरली. यासह तिने प्रतिष्ठेच्या ‘कँडिडेट्स’ स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. अखेरच्या ११व्या फेरीअंती वैशाली आणि कॅटेरिना लायनो यांचे समान आठ गुण होते. सरस ‘टायब्रेक’ गुणफरकामुळे वैशालीने विजेतेपद राखले.



अखेरच्या फेरीत वैशालीसमोर माजी जगज्ज्जेत्या चीनच्या टॅन झोंगयीचे, तर लायनोसमोर उलविया फतालियेवाचे आव्हान होते. उलवियाने अद्याप ग्रँडमास्टरचा किताबही न मिळवल्याने या लढतीत लायनोचे पारडे जड मानले जात होते, मात्र लायनो सर्वोत्तम खेळ करण्यात अपयशी ठरली आणि तिला बरोबरीवर समाधान मानावे लागले. यानंतर वैशालीने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना मानसिक कणखरता दाखवून आपल्यापेक्षा अधिक अनुभवी झोंगयीला बरोबरीत रोखले. ही कामगिरी तिला स्पर्धा जिंकण्यासाठी पुरेशी ठरली.

वैशालीने या स्पर्धेत ११ फेऱ्यांत सहा विजय मिळवले, तर चार लढती बरोबरीत सोडवल्या. तिला एका लढतीत पराभव पत्करावा लागला. लायनोने एकही लढत गमावली नाही, परंतु सहा लढती बरोबरीत सोडविण्याचा तिला फटका बसला. वैशाली क्रमवारीत तिच्यापेक्षा वरच्या स्थानावर असलेल्या झोंगयीविरुद्ध खेळली आणि याचा तिला ‘टायब्रेक’मध्ये फायदा झाला. ‘टायब्रेक’मध्ये वैशालीच्या खात्यावर लायनोपेक्षा एक गुण अधिक होता.

# बॉक्सिंग स्पर्धेत ‘सीकेटी’ची चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महापालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धा कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.

‘सीकेटी’च्या पल्लवी अशोक कणसे, रितुल रवींद्र म्हात्रे, तेजल प्रदीप भोईटे, अजय जालिंदर सत्रे व अनिकेत दुशिंग या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके पटकावली आहेत. या सर्व विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याशिवाय स्मित संदीप पाटील याने रौप्य, तर पार्थ रामचंद्र पाटील याने कांस्यपदक पटकावले आहे. क्रीडाशिक्षक अरुण पाटील व मनोज पाटील यांनी या विद्यार्थ्यांची स्पर्धेसाठी तयारी करून घेतली.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# युवराज, उथप्पा यांना ईडीचे समन्स

**नवी दिल्ली** : सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) माजी भारतीय क्रिकेटपटू युवराज सिंग आणि रॉबिन उथप्पा यांना चौकशीसाठी समन्स बजावले आहेत. उथप्पाला २२ सप्टेंबर रोजी दिल्लीतील ईडी मुख्यालयात आणि युवराजला २३ सप्टेंबर रोजी हजर राहण्यास सांगितले आहे.

ऑनलाइन सट्टेबाजी ॲपशी संबंधित मनी लॉण्डरिंगप्रकरणी दोघांनाही नोटीस बजावली आहे. उथप्पा सध्या आशिया कप २०२५च्या समालोचन संघाचा भाग आहेत. या प्रकरणात आतापर्यंत चार माजी भारतीय क्रिकेटपटूंना चौकशीसाठी बोलावले गेले असून याआधी सुरेश रैना आणि शिखर धवन यांची ईडीने चौकशी केली होती.

# वासांबे प्रीमियर लीगसाठी ऑक्शन उत्साहात; २२७ खेळाडूंचा सहभाग



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे ग्रामपंचायत माजी सरपंच संदीप मुंढे आयोजित वासांबे प्रीमियर लीग पर्व ३चे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी खेळाडू लिलाव (ऑक्शन) सोहळा मोहोपाडा पानशील येथील वृंदावन फार्म येथे झाला. या वेळी ट्रॉफीचे अनावरण उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

डब्ल्यूपीएल पर्व ३साठी एकूण १२ संघांची नोंदणी झाली आहे. यामध्ये विघ्नेश इलेव्हन वरोसे, धैर्यशील इलेव्हन आई एकविरा लोधिवली, कपिल एंटरप्राईजेस रिस, आई टाकेदेवी दांडफाटा, एनडीज नक्ष वेदांत इलेव्हन कांबे, श्री गणेश इलेव्हन गणेश नगर, यश युवराज इलेव्हन चांभार्ली, कैवल्य मंथन इलेव्हन मोहोपाडा, अनन्या इंटरप्रायजेस तळेगाववाडी, मल्लिकार्जुन खाने आंबिवली, बल्लाळेश्वर आळी आंबिवली, राजवाड्याचा राजा या संघांमध्ये चुरस असणार आहे.

लिलाव सोहळ्यासाठी १२ अष्टपैलू, १२ फलंदाज, १२ गोलंदाजांसह नियमित नोंदणी झालेल्या अशा एकूण २२७ खेळाडूंचा समावेश होता. या लिलावात यंदाची सर्वाधिक बोली लावण्यात आलेला खेळाडू तन्वीर चौधरी हा ठरला. सूत्रसंचालन टी.के. माळी, संतोष चौधरी व रोशन पाटील यांनी केले.

या स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक विजेत्या संघांना रोख रक्कम, चषक असे पारितोषिक असून असून दुचाकी, एलईडी टीव्ही, लकी ड्रॉसारखी अन्य बक्षिसे जिंकण्याची संधी खेळाडूंना आहे.

# बॅडमिंटन स्पर्धेत एमएनएम विद्यालयाला विजेतेपद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या गव्हाण-कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समधील विद्यार्थिनींनी अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे.

या स्पर्धेचे आयोजन पनवेल तालुका क्रीडा संकुलात करण्यात आले होते. क्रीडा समन्वयक प्रवीण खुटारकार आणि मंदार मुंबईकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. स्पर्धेत एमएनएम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. यशस्वी विद्यार्थिनींमध्ये रिद्धीमा कर्मवीर म्हात्रे, यज्ञा वसंत देशमुख, स्वरा सचिन ठाकूर, प्रियांका लावसकर, सई अविनाश मोकल यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक वामन कुऱ्हाडे, वर्षा नलावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, भार्गव ठाकूर, प्राचार्य सायली वडवलकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी, सर्व शिक्षक व पालकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.






# हस्तांदोलन वादावरून पाकिस्तानचीच नाचक्की!

## आयसीसीने फेटाळली मॅच रेफरींना हटवण्याची मागणी



**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध सहज विजय मिळवला. या सामन्यात नाणेफेकीच्या वेळी आणि सामना संपल्यानंतर भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा याच्याशी हस्तांदोलन केले नाही. आता या मुद्द्यावरून पाकिस्तानची पुन्हा एकदा नाचक्की झाली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आशिया चषकातील उर्वरित सामन्यांमधून मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांना हटवण्याची पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची (पीसीबी) मागणी फेटाळून लावली आहे. आयसीसीने या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर आपला निर्णय पीसीबीला कळवला आहे.

रिपोर्टनुसार आयससीसीच्या काही अधिकाऱ्यांना (यामध्ये पाकिस्तान क्रिकेट बोर्डच्या संचालकांचाही समावेश होता) दोन्ही संघांचे कर्णधार सामन्यानंतर हस्तांदोलन करणार नाहीत याची आधीच कल्पना होती. तरीही पीसीबी आणि अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी या प्रकरणावरून वाद निर्माण केला. त्यामुळे आयसीसीने पीसीबीची मागणी फेटाळली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com